मराठी महाराष्ट्राचा बुलंद आवाज

# महासागर

» मुंबई कार्यालय
बोरा बजार स्ट्रीट, फोर्ट, मुंबई - ४०० ००१.
फोन : ०२२ ३१८५ ०७३५

» पालघर कार्यालय
२०८/बी, लोकमान्य बिल्डींग, तालुका पंचायत समिती कार्यालयासमोर, पालघर, ४०१४०४ मो. ९८९२९६८७२५

» नाशिक कार्यालय
'आनंदी', कोतवाल पार्क, टिळकवाडी, वेद मंदिरासमोर, धामणकर कॉर्नर, नाशिक ४२२००२. मो. ९८९०१०९९७८

» वितरण
मो. नं. ८४२४९३६४३६

नाशिक » सोमवार, २१ एप्रिल २०२५ » वर्ष: ६ » अंक:१२३ » पाने-८ » किंमत रू. २ + वितरण खर्च रू. १ एकूण रू.३

## अहिल्यानगर जिल्हा ड्रग्स फ्री झाला पाहिजे - राधाकृष्ण विखे पाटील

**अहिल्यानगर, दि. २० प्रतिनिधी**

मागील काही दिवसापासून अहिल्यानगर जिल्ह्यात आमली पदार्थांबाबत अनेक तक्रारी येत असल्यामुळे पोलिसांना त्यावर कारवाई करण्याच्या सूचना दिल्या असल्याची माहिती पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिली आहे. अनेक महाविद्यालयांच्या बाजूला असलेल्या कॅफेमध्ये अमली पदार्थ सहज उपलब्ध होत असल्यामुळे त्यावर कारवाई करावी सोबतच गुटखा निर्मिती ज्या ठिकाणी होते तेथे देखील कारवाई करावी अशा सूचना पोलिसांना देण्यात आले आहे हे कोणच जिल्हा ड्रग्स फ्री झाला पाहिजे अशी भूमिका आमची असल्याचं विखे म्हणाले. तसेच जिल्ह्यात शंभर टक्के गोमांस बंदी झाली पाहिजे असे देखील ते म्हणाले.

## अग्रलेख – खरीखरी

### समन्वय राखला पाहिजे

वक्फच्या मुद्द्यावरून सरकार, सर्वोच्च न्यायालय, बरेचसे विरोधी पक्ष, मुस्लिम समाजाचे अनेक नेते, आता वेगवेगळ्या प्रकारे कार्यरत होत आहेत. येत्या ३० तारखेला हैदराबाद शहरात प्रचंड मोठा विरोध दर्शविण्याचा कार्यक्रम होणार आहे. या कार्यक्रमासाठी त्या राज्यातील सत्तारूढ पक्ष आणि इतर अनेक विरोधी पक्षाने फारच मोठी तयारी करीत आहेत. त्यापूर्वी मानवी साखळी आणि निषेध आंदोलने या ठिकाणी होणार आहेत. ३० एप्रिल रोजी रात्री नऊ वाजता 'ब्लॅक-आऊट' करण्याचे घोषित करण्यात आलेले आहे. त्या तारखेपर्यंत सरकारी आणि विरोधी पक्षाला आपापली निवेदने सर्वोच्च न्यायालयात सादर करावयाची आहेत. सर्वोच्च न्यायालयाच्या भूमिकेवर किरेन रिजीजू उपराष्ट्रपती धनखड आणि इतर काही नेते वेगळी भूमिका घेत आहेत. आपल्या देशात अशा प्रकारचा वाद होऊन वातावरण चिघळले. तर त्याचे परिणाम एकूणच समाजासाठी आणि समाजाच्या स्वास्थ्यासाठी चांगले असणार नाहीत. वक्फचा मुद्दा निश्चितपणे विवादात्मकच आहे. संसदेने त्यासाठी कायदा केलेला आहे. त्याला राष्ट्रपतींनी मंजुरीही दिलेली आहे. पण हे विधेयक संविधानाला धरून नाही. हा मुद्दा घेऊन सर्वोच्च न्यायालयात १०० पेक्षा जास्त अर्ज याचिका म्हणून आलेले आहेत. सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश खन्नासाहेबांनी सरकार पक्षाला वेगवेगळे प्रश्न विचारून त्यांच्या उत्तरासाठी पुढील सात दिवस दिलेले आहेत. वक्फ बोर्डावर गैर मुस्लिम सदस्यांना नियुक्त करण्यासाठी कायद्यात तरतूद करण्यात आलेली आहे. हिंदू मंदिराच्या ट्रस्टमध्ये, संस्थांमध्ये किंवा अशा प्रकारच्या कोणत्याही संघटनांमध्ये गैरहिंदू सदस्य घेणे अशी तरतूद आपल्याला परवडेल का, असाही प्रश्न आहे. तिकडे बुद्धगयामध्ये तेथील अधिकार गैर बुद्धांच्या हातून काढून बौद्धांच्या हाती देण्यात यावेत, म्हणून आंदोलन सुरूच आहे. कालच अनधिकृत असल्याचा दाखला देत विलेपार्ले येथील दिगंबर जैन समाजाचे मंदिरही मुंबइच्या पालिकेने आपला हातोडा चालवून पाडलेले आहे. जैन समाजाने केलेल्या अहिंसावादी मूक आंदोलनामुळे परिस्थिती कुठून कुठे चालली आहे, याची जाणीव होते. देशातील एकूण वातावरण अशा गोष्टींसाठी तापले. तर आपल्या देशातील शांतता भंग होऊ शकते. संसदेने पारित केलेल्या कायद्यातील अनेक तरतुदी त्रुटीपूर्ण आहेत. असे इतर कोणी नाही तर सर्वोच्च न्यायालय म्हणते. देशाची न्यायपालिका निष्पक्ष राहिली पाहिजे आणि न्याय पालिकेचा निर्णय संविधानला धरूनच करता येतो. हे मुद्दाम अधोरेखित करणे आता गरजेचे आहे. बहुमताच्या बळावर संसदेत कोणताही कायदा संमत करता येतो. पण तो संविधानाच्या अनुरूप आहे की नाही. हे पाहणे केवळ सर्वोच्च न्यायालयालाच शक्य आहे. हा मुद्दा आता वेगवेगळ्या पातळीवर वादाचे कारण ठरणार असे दिसते आहे. वक्फच्या जमिनी अरबो-खरबो रुपयांच्या आहेत. त्यावर अनेक मठाधीश भूमाफियांसारखे बसलेले आहेत. हे सरकारचे म्हणणे अगदी रास्त आहे. पण या जमिनीचा उपयोग पुढे कसा करावा. याबाबतीत सरकार पक्ष आणि विरोधी पक्ष यांनी समन्वय साधणे आता नितांत गरजेचे झालेले आहे. चंद्राबाबू नायडूंचा पक्ष, नितीश कुमार यांचा पक्ष, चिराग पासवान यांचा पक्ष, चौधरी चरणदास यांचा पक्ष यांच्यातही बरीच धुसफूस आहे. याशिवाय महाराष्ट्रातील सत्ताधारी राष्ट्रवादी काँग्रेस आणि इतर छोटेमोठे पक्षही मुस्लिमांच्या मतामुळे निवडून येत असतात. त्यामुळे ते नाराज झाले. तर या पक्षांना आपले चंबूगबाळे आवरावे लागणार की काय, हा सुद्धा विचारणीय प्रश्न आहे. आपल्यासारख्या बहुभाषिक, बहुधर्मीय, बहुप्रांत असलेल्या देशाला या परस्परांतील द्वेषापासून वाचवणे गरजेचे आहे. सरकारी पक्षाने आपल्या भात्यातून तीर काढून तो डागून दिला आहे. त्यामुळे आता प्रस्थापित कायद्यात काही बदल करता येइल काय. याचे उत्तर सरकारला द्यायचे आहे. सर्वोच्च न्यायालयाने काही महत्त्वाच्या तरतुदींना स्थगिती दिली. तर या कायद्याचे बारा वाजू शकतात. हे सर्वज्ञात आहे. सरकारलाही हे परवडण्यासारखे नाही. अशा वातावरणात ३० एप्रिल रोजी हैदराबाद मध्ये सर्वपक्षीय ब्लॅकआउट होणार आहे. त्याचे लोण इतरत्र पसरू न देणे. यासाठी सरकारला पुढाकार घ्यावाच लागेल. त्यामुळे या प्रश्नावर सरकार आणि विरोधी पक्षांनी सकारात्मक चर्चा करून समन्वय राखला पाहिजे. सद्यस्थितीमध्ये तेच महत्त्वाचे आहे.

nagpurpost@gmail.com
Mob.No.9922970023

## वक्फ कायद्याविरोधात 'ब्लॅकआउट'

### हैदराबादमध्ये मुस्लीम नेते-धर्मगुरु एकवटले



**हैदराबाद, दि. २० वृत्तसंस्था**

संसदेने नुकत्याच मंजूर केलेल्या वक्फ कायद्याविरोधात काही राज्यांमध्ये निदर्शने होताना दिसत आहेत. याशिवाय सर्वोच्च न्यायालयातही यासंदर्भात सुनावणी सुरू आहे. यातच शनिवारी ऑल इंडिया मुस्लीम पर्सनल लॉ बोर्डाने हैदराबादेत एका सर्वसाधारण सभेचे आयोजन केले होते. याला एआयएमआयएमनेही पाठिंबा दिला.

दरम्यान, ३० एप्रिल २०२५ रोजी ब्लॅकआउट निषेध करण्याचीही घोषणा करण्यात आली आहे. यात रात्री ९ वाजता घरातील सर्व दिवे बंद करण्यात येतील. हैदराबाद येथील एआयएमआयएमचे मुख्यालय दारुस्सलाम येथे आयोजित 'वक्फ वाचवा, संविधान वाचवा' जाहीर सभेत, ही घोषणा करण्यात आली. यावेळी काँग्रेस, भारत राष्ट्र समिती, वायएसआर काँग्रेस पार्टी आणि द्रविड मुन्नेत्र कळघम यासह अनेक पक्षांचे हजारो लोक आणि सदस्य उपस्थित होते.

एआयएमआयएम प्रमुख तथा हैदराबादचे खासदार असदुद्दीन ओवेसी म्हणाले, "हे आंदोलन आपल्याला संपवू इच्छिणाऱ्या शक्तींविरोधात आहे, मात्र आपण पुढेही वाढत राहू. आपल्यात फूट पाडण्याचा प्रयत्न करणाऱ्या या शक्तींचा पराभव होईल. आम्ही झुकणार नाही. जेव्हा मी संसदेत कायदा फाडला, तेव्हा मी माझ्या इतर धर्मातील सर्व बंधू आणि भगिनींच्या वतीने ते केले. ज्यांना अशा प्रकारच्या क्रूर कायद्यांचा फटका बसेल."

या सर्वसाधारण सभेत १८ मे रोजी शहर पातळीवर राउंड-टेबल मीटिंग आयोजित करण्याचा आणि नंतर सर्व जिल्ह्यांमध्ये अशाच बैठका आयोजित करण्याचा निर्णय घेण्यात आला. २२ मे रोजी हैदराबादमधील ईदगाह बिलाली हॉकी ग्राउंडवर महिलांच्या एक सभेचे आयोजित केली जाईल. यानंतर, २५ मे रोजी हैदराबादमध्ये दुपारी २ ते २.३० वाजेपर्यंत मानवी साखळी करून निषेध करण्यात येईल आणि १ जून रोजी धरणे दिले जाईल. याशिवाय, "स्थानिक नेतृत्वाशी सल्लामसलत करून आंध्र आणि तेलंगणा जिल्ह्यांमध्ये सार्वजनिक सभा घेतल्या जातील," अशी घोषणाही एआयएमपीएलबी नेतृत्वाने रविवारी केली.

## महाराष्ट्र हिताच्या फॉर्म्युल्यात भाजपा बसत नाही - संजय राऊत



**मुंबई, दि. २० प्रतिनिधी**

राज ठाकरे आणि उद्धव हे ठाकरे बंधू एकत्र येण्याची चर्चा पुन्हा हा सुरू सुरू झाली आहे. मनसे प्रमुख राज ठाकरे यांनी एका मुलाखतीत याबाबत केलेले सुतोवाच आणि त्याला उद्धवसेनेचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी दिलेला सकारात्मक प्रतिसाद या पार्श्वभूमीवर ही चर्चा यावेळी प्रत्यक्षात साकार होण्याची आशा दोन्ही पक्षाच्या कार्यकर्त्यांना वाटत आहे. राज ठाकरे यांनी महेश मांजरेकर यांना दिलेल्या मुलाखतीत मनोमिलनाचे संकेत दिले. त्याला उद्धव ठाकरे यांनी कामगार सेनेच्या मेळाव्यात बोलताना राज यांच्या हाकेला सकारात्मक प्रतिसाद दिला. त्यानंतर राजकीय क्षेत्रात संमिश्र प्रतिक्रिया उमटू लागल्या आहेत.

पत्रकारांशी बोलताना संजय राऊत यांनी पुन्हा एकदा ठाकरे बंधूंच्या एकत्र येण्याच्या चर्चांवर स्पष्ट शब्दांत भाष्य केले. तुम्ही शिवाजी पार्कवरील कॅफे असा उल्लेख करता, त्या राज ठाकरे यांच्या शिवतीर्थावर जाऊन ठाकरे गट युतीची चर्चा करणार का, असा प्रश्न संजय राऊतांना करण्यात आला. यावर संजय राऊत यांनी सूचक विधान केले आहे.

संजय राऊत म्हणाले की, तुम्हाला काय वाटते की, आम्ही राज ठाकरे यांच्याबरोबर बोलत नाहीत का? मग का जाणार नाही? उद्धव ठाकरे यांनी कोणतीही अट ठेवलेली नाही. मला सांगा त्यात अट आणि शर्त कोणती? कोणतीही नाही. राज ठाकरे म्हणत आहेत की, महाराष्ट्र हितासाठी आणि उद्धव ठाकरे हेही महाराष्ट्राच्या हितासाठीच म्हणत आहेत. मग प्रश्न एवढाच आहे की महाराष्ट्र हिताच्या फॉर्म्युल्यात भाजपा बसत नाही. ही अट नाही, तर लोकभावना आहे. हा विषय विशेषतः महाराष्ट्राच्या भावनेचा आहे, असे संजय राऊत यांनी म्हटले आहे.

दरम्यान, मतभेद आणि वाद दूर ठेवून जर दोन्ही ठाकरे एकत्र येणार असतील तर आम्ही त्यांचे स्वागत केले आहे. यामध्ये कोणतीही अट किंवा शर्त उद्धव ठाकरे यांनी ठेवलेली नाही. महाराष्ट्र हितालाच प्राधान्य द्या, जे महाराष्ट्र आणि महाराष्ट्राच्या हिताचे शत्रू आहेत, त्यांच्या पंक्तीलाही बसू नका. यात कोणती अट आणि शर्त आली? उद्धव ठाकरे यांनी म्हटले आहे की, जे लोक महाराष्ट्र हिताच्या आडवे येतील त्यांना घरात घ्यायचे नाही, त्यांचे स्वागत करू नका. यात चुकीचे काय आहे? असे संजय राऊत यांनी म्हटले आहे.

## पंतप्रधान मोदी आणि मुख्यमंत्री नितीश कुमार यांची जोडी फक्त खुर्चीसाठी आहे - मल्लिकार्जुन खरगे



**बक्सर, दि. २० वृत्तसंस्था**

बिहार विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे आज एक दिवसीय बिहार दौऱ्यावर आले. त्यांनी बक्सर येथे जनतेला संबोधित करताना सांगितले की, "मी बिहारमधील त्या सर्व लोकांना वंदन करतो, ज्यांचे विचार आज देशभर आणि जगभर स्मरणात ठेवले जातात. महात्मा गांधींनी सत्याग्रह आंदोलन बिहारच्या चंपारणमधून सुरू केले होते. हे आंदोलन स्वातंत्र्य लढ्याशी संबंधित होते. आता आम्ही 'जय बापू, जय भीम आणि जय संविधान रॅली'साठी या महान भूमीवर आलो आहोत, आणि हे आमचे भाग्य आहे."

ते म्हणाले, "माझे भाग्य समजतो की आज मला गंगेच्या तीरावर वसलेल्या या भागात येण्याची संधी मिळाली, ही ती भूमी आहे जिथे संविधान सभेचे प्रोटेम अध्यक्ष सच्चिदानंद सिन्हा यांचे वास्तव्य होते. बिहारच्या भूमीवरच महात्मा बुद्धांनी तपस्या करून ज्ञान प्राप्त केले आणि आज संपूर्ण जग बुद्धांच्या शांततेच्या संदेशाला मानते. गुरु गोविंद सिंह यांचा जन्मही याच भूमीवर झाला आणि अनेक महापुरुष, समाजसुधारकही बिहारमधूनच पुढे आले. येथून अनेक राजकारणी पुढे आले, ज्यांनी देशासाठी आपले योगदान दिले."

काँग्रेस अध्यक्षांनी राष्ट्रीय लोकशाही आघाडीवर हल्ला चढवताना सांगितले की, "पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि मुख्यमंत्री नितीश कुमार यांची जोडी ही केवळ खुर्चीसाठी आहे. ही जोडी बिहारच्या विकासासाठी नाही." मुख्यमंत्री नितीश कुमार यांच्यावर टीका करताना त्यांनी सांगितले की, "ते कधी इंडिया आघाडीच्या गोटात जातात, काही दिवस तिथे घालवल्यानंतर भाजप येणार आहे असं वाटलं की लगेच तिकडून इकडे येतात. हे देशासाठी योग्य नाही. ते गरीब, शेतकरी, अस्पृश्य, मागास आणि अतिमागास वर्गाचा विनाश करण्यासाठी तिकडे जातात."

काँग्रेस अध्यक्षांनी पंतप्रधान नरेंद्र मोदींवर आरोप केला की, "त्यांनी जबरदस्तीने वक्फ कायद्यात दुरुस्ती केली. ज्या कायद्यावर वर्षानुवर्षे वाद नव्हता, तिथे आता वाद निर्माण करायचा प्रयत्न केला जात आहे. आरएसएस आणि भाजप गरीब, मागास, महिलांचे मित्र असू शकत नाहीत."

मनुस्मृतीचा उदाहरण देत त्यांनी सांगितले की, "महिलांना शिकवू नये, पवित्र कामात सामील करू नये, असे त्या ग्रंथात सांगितले आहे. पण बाबासाहेब डॉ. भीमराव आंबेडकर यांनी महिलांना मान-सन्मान दिला."

## डॉ. वळसंगकर आत्महत्याप्रकरणी रुग्णालयातील महिला कर्मचाऱ्याला अटक

**सोलापूर, दि. २० प्रतिनिधी**

सोलापुरातील प्रख्यात मेंदूविकार तज्ज्ञ डॉ. शिरीष वळसंगकर (वय ७०) यांच्या आत्महत्याप्रकरणी त्यांच्याच रुग्णालयातील एका महिला कर्मचाऱ्याला पोलिसांनी रविवारी अटक केली आहे. संबंधित महिलेवर आर्थिक गैरव्यवहार केल्याचा आरोप होता. हा प्रकार अंगलट येऊ नये म्हणून ही महिला कर्मचारी डॉ. वळसंगकर यांना सतत धमकावत होती, असा आरोप आहे. त्यास कंटाळून त्यांनी आत्महत्या केल्याच्या आरोपावरून पोलीस तपास सुरू आहे. ही महिला एका राजकीय पक्षाच्या स्थानिक नेत्याशी संबंधित आहे. तिच्याविरुद्ध सदर बाजार पोलीस ठाण्यात पुन्हा दाखल झाला आहे. डॉ. वळसंगकर यांचे पुत्र, मेंदूविकार तज्ज्ञ डॉ. अश्विन वळसंगकर यांनी याबाबत दिलेल्या फिर्यादीनुसार ही कारवाई करण्यात आली.संबंधित महिला डॉ. शिरीष वळसंगकर यांच्या एसपी इन्स्टिट्यूट ऑफ न्यूरोसायन्स रुग्णालयात नोकरीस होती. या रुग्णालयात आर्थिक गैरव्यवहारातून ती अडचणीत आली होती. मात्र यानंतरही डॉ. अश्विन वळसंगकर यांनी तिला वेळोवेळी सहकार्य केले. परंतु तरीही ती, कारवाई केली तर आत्महत्या करण्याची धमकी डॉ. शिरीष वळसंगकर यांना देत होती. डॉ. वळसंगकर तिच्या सततच्या त्रासाला वैतागले होते. त्यातूनच त्यांनी मोदीखान्यातील आपल्या राहत्या घरी गोळ्या झाडून आत्महत्या केली. या घटनेमुळे संपूर्ण वैद्यकीय क्षेत्राला धक्का बसला. पोलिसांनी या घटनेची अकस्मात मृत्यू म्हणून नोंद करून तपास हाती घेतला असता, हा प्रकार उघडकीस आला. सदर बाजार पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अजित लकडे पुढील तपास करीत आहेत.

## जम्मू-काश्मीरमध्ये ढगफुटी, तीन जणांचा मृत्यू



**रामबन, दि. २० वृत्तसंस्था**

जम्मू-काश्मीरमध्ये गेल्या काही दिवसांपासून पाऊस पडत आहे. रविवारी सकाळी रामबन जिल्ह्यातील सेरी बागना भागात मोठ्या प्रमाणात ढगफुटी सदृश्य पाऊस झाला. तसेच वारा आणि गारपीट झाल्यामुळे तीन जणांचा मृत्यू झाला असल्याची माहिती समोर येत आहे. अनेक ठिकाणी इमारती कोसळल्या आहेत. तसेच ढगफुटी सदृश्य पावसामुळे शेकडो रहिवाशांना स्थलांतरित करण्यात आले आहे. मुसळधार पाऊस आणि वाऱ्यामुळे वाहतुकीलाही मोठा अडथळा निर्माण होत असल्याची माहिती सांगितली जात आहे.

रामबन जिल्ह्यात ढगफुटी आणि अचानक आलेल्या ढगफुटी सदृश्य पावसाच्या परिस्थितीमुळे परिस्थिती बिकट झाली आहे. दोन हॉटेल्स, काही दुकानं आणि काही घरांचं मोठ्या प्रमाणात नुकसान झालं आहे. तसेच अनेक ठिकाणी भूस्खलनामुळे राष्ट्रीय महामार्ग बंद करण्यात आले आहेत. रामबनच्या उपायुक्तांनी सांगितलं की रात्री १.१० वाजता सुरू झालेला मुसळधार पाऊस दुपारपर्यंत सुरूच होता.

हवामान खात्याने आधीच सतर्कतेचा इशारा दिला होता. तसेच जिल्हा प्रशासनाच्या स्थानिक अधिकाऱ्यांनी अनेक भागात या संदर्भातील परिस्थितीबद्दल सतर्कतेच्या सूचना देखील दिल्या होत्या. दरम्यान, उपायुक्त कार्यालयाने स्थापन केलेल्या आपत्कालीन नियंत्रण कक्षाने सखल भागातील लोकांना सुरक्षित ठिकाणी पोहोचवण्यासाठी महसूल आणि पोलिसांचे पथक तैनात करण्यात आले आहे. आतापर्यंत सुमारे ५०० लोकांना सुरक्षित ठिकाणी हलवण्यात आल्याचं वृत्तात म्हटलं आहे.

तसेच रामबन शहराच्या बाहेरील एका गावात घराच्या ढिगाऱ्याखाली तीन जण गाडले गेले आहेत. त्यांचे मृतदेह प्रशासनाने बाहेर काढल्याची माहिती उपायुक्तांनी सांगितली आहे. तसेच प्रशासनाच्या अधिकाऱ्यांची टीम अडचणीत असलेल्या लोकांना अद्यापही मदत करण्यासाठी काम करत असल्याची माहितीही त्यांनी दिली आहे.

रामबन जिल्ह्यातील विविध ठिकाणी झालेल्या भूस्खलनामुळे जम्मू आणि श्रीनगर राष्ट्रीय महामार्ग वाहनांसाठी बंद करण्यात आला आहे. श्रीनगरला जाणारी विमान वाहतूकही विस्कळीत झाल्याची माहिती समोर आली आहे. ढगफुटीमुळे अनेक इमारतींचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून शेकडो वाहनेही चिखलात अडकली आहेत. तसेच अद्यापही मुसळधार पाऊस पडत आहे. त्यामुळे आता हवामानात बदल झाल्यानंतर पाऊस पडण्याचा बंद झाल्यानंतर मालमत्तेच्या नुकसानीचा आढावा घेतला जाणार असल्याची माहिती अधिकाऱ्यांनी दिल्याचे वृत्त आहे.

## अजित पवारांचे हेलिकॉप्टर बिघडले


### राष्ट्रवादीचा मेळावा रद्द

**नाशिक, दि. २० प्रतिनिधी**

उपमुख्यमंत्री अजित पवार आणि ज्येष्ठ नेते छगन भुजबळ यांच्या उपस्थितीत नाशिकमध्ये मेळावा होणार होता. मात्र, हेलिकॉप्टरमध्ये बिघाड झाल्यामुळे पवारांचा दौरा रद्द झाला. त्यामुळे अजित पवार गटाचा मेळावाही रद्द करण्यात आला. विधानसभा निवडणुकीनंतर अजित पवार गटाने जिल्ह्यात कार्यकर्त्यांसाठी एकही कार्यक्रम घेतला नव्हता. त्यातच माजी मंत्री विद्यमान आ. छगन भुजबळ यांना मंत्रिपद देण्यात न आल्याने पक्षांतर्गत नाराजीनाट्य रंगले होते. त्यामुळे या मेळाव्याकडे कार्यकर्त्यांसह राजकीय क्षेत्राचे लक्ष लागले होते. भुजबळ आणि अजित पवार एकाच व्यासपीठावरून काय बोलतात, याकडे लक्ष लागले होते. त्यासाठी नाशिकमधील रस्त्यांवर मोठमोठे बॅनरही लावण्यात आले होते.

नाशिक जिल्ह्यात अजित पवार गटाच्या आमदारांची संख्याही जास्त आहे. त्यामुळे मंत्रिपदासह महामंडळाचे मोठे पदही या पक्षाकडे आहे. यासाठी मेळाव्याची जय्यत तयारी करण्यात आली होती. परंतु, अजित पवारांच्या हेलिकॉप्टरमध्ये झालेला बिघाड प्रयत्न करूनही ते सुरू न झाल्याने पवारांनी दौरा रद्द केला. त्यामुळे मेळावा रद्द केला असून, तो पुन्हा कधी घ्यायचा, याबाबत नेत्यांशी चर्चा करून त्याबाबत निर्णय घेतला जाईल, अशी माहिती शहराध्यक्ष रंजन ठाकरे यांनी दिली.

## रणजीत कासलेविरोधात आणखी एक गुन्हा दाखल



**बीड, दि. २० प्रतिनिधी**

धनंजय मुंडे आणि राज्य सरकारवर आरोप करणारा बडतर्फ पोलिस उपनिरीक्षक रणजीत कासले याच्याविरोधात तिसरा गुन्हा नोंद करण्यात आला आहे. आईच्या उपचारासाठी म्हणून अंबाजोगाईतील व्यवसायिकाकडून सहा लाख रुपये घेतले पण वारंवार मागणी करुन ते परत केले नाहीत असा आरोप करत हा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सुधीर चौधरी असे फसवणूक झालेल्या व्यापाऱ्याचे नाव आहे.

रणजीत कासले हा अंबाजोगाई मध्ये कार्यरत असताना सुधीर चौधरी यांच्याशी त्याची मैत्री होती. या मैत्रीतूनच कासले याने आईच्या उपचारासाठी म्हणून सहा लाख रुपये उसने घेतले होते. पण वारंवार मागणी करूनही त्याने ते परत न केल्याने आता चौधरी यांच्या तक्रारीवरून अंबाजोगाई शहर पोलिस ठाण्यामध्ये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

गेल्या काही दिवसात रणजीत कासले याच्यावर दाखल झालेला हा तिसरा गुन्हा आहे. वेगवेगळे व्हिडिओ बनवत खळबळजनक दावे करणारा कासले हा सध्या शिवाजीनगर पोलिसांच्या कोठडीत आहे. या दरम्यान त्याच्यावर परळी आणि अंबाजोगाई येथे दोन गुन्हे दाखल झालेले आहेत.

परळी विधानसभा निवडणुकीच्या वेळी ईव्हीएमपासून दूर राहण्यासाठी आपल्याला 10 लाख रुपये देण्यात आल्याचा दावा रणजित कासले याने केला होता. ही रक्कम बाळूमामा कन्स्ट्रक्शन कंपनीच्या अकाऊंटवरून आल्याचा दावा त्याने केला होता. त्यावर बाळूमामा कन्स्ट्रक्शन कंपनीच्या वतीने स्पष्टीकरण देण्यात आलं आहे.

रणजित कासलेला देण्यात आलेले दहा लाख रुपये हे त्याच्या मुलांच्या शाळेच्या फी साठी दिल्याचा दावा बाळूमामा कन्स्ट्रक्शनचे सुदर्शन काळे यांनी केला. आपले पैसे मिळावे यासाठी काळे यांनी बीड पोलिसांना महिनाभरापूर्वीच अर्ज दिला होता. कासलेने साडेसात लाख रुपये पुन्हा दिल्याचे देखील काळे यांनी म्हटले आहे. परंतु ईव्हीएम पासून दूर राहणे, वाल्मिक कराडचा एन्काऊंटर करणे या आरोपात तथ्य नसल्याचे देखील सुदर्शन काळे यांनी म्हटले.

## मनसेचे मोहन भागवतांना खुले पत्र



**मुंबई, दि. २० प्रतिनिधी**

नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची यंदापासून अंमलबजावणी करण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला असून त्यानुसार पहिलीपासून हिंदी अनिवार्य करण्यात येणार आहे. हिंदी भाषा अनिवार्य करण्याला काही राजकीय पक्षांनी विरोध केला आहे. इयत्ता पहिली ते पाचवीसाठी मराठी व इंग्रजी माध्यमांच्या शाळांमध्ये हिंदी ही तृतीय भाषा म्हणून अनिवार्य करण्याला राज्यातील सात शिक्षक संघटनांनी याला विरोध केला आहे. महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने पहिल्या दिवसापासून हिंदी भाषेच्या सक्तीला विरोध केला आहे.

मनसे प्रमुख राज ठाकरे यांनीही एक्सवर एक पोस्ट करत हिंदी भाषा सक्तीला स्पष्ट विरोध करत थेट इशारा दिला आहे. ठाकरे गटानेही हिंदी सक्तीला स्पष्ट शब्दांत विरोध दर्शवला आहे. महाविकास आघाडीचे अनेक नेते हिंदी सक्तीच्या विरोधात आहेत. तर महायुतीचे नेते हिंदी सक्तीबाबत सकारात्मक भूमिका घेताना पाहायला मिळत आहेत. यातच हिंदी सक्तीच्या मुद्द्यावरून मनसे नेते संदीप देशपांडे यांनी आता थेट राष्ट्रीय स्वयंसेवक संघ म्हणजेच RSS सरसंघचालक मोहन भागवत यांना एक खुले पत्र लिहिले आहे.

खरे तर आपल्याला प्रत्यक्ष भेटून आमच्या भावना आपल्या समोर मांडाव्यात अशी मनापासून इच्छा होती. पण माझ्यासारख्या सामान्य राजकीय कार्यकर्त्याला भेटता येईल का? ही शंका आहे म्हणून हे खुल पत्र आपल्याला लिहीत आहे. हिंदुस्थानचा इतिहास आहे, मराठ्यांनी जवळ-जवळ पूर्ण भारतावर राज्य केले. इंग्रजांनी सुद्धा हिंदुस्थान जिंकला तो मुघलांकडून नाही तर मराठ्यांकडून, होळकरांचे इंदूरमध्ये राज्य होते. शिंदेच ग्वालियरमध्ये होते. गायकवाड बडोदामध्ये होते. अगदी दक्षिणेमध्ये तंजावर वर सुद्धा मराठ्याचं राज्य होते. खर तर जवळ जवळ २०० वर्षे मराठ्यांचे अधिपत्य हे हिंदुस्थान वर होते. एवढ असून सुद्धा मराठ्यांनी कधी ही मराठी भाषा ही तिथल्या राज्यांवर लादली नाही. अगदी गुगल नसताना सुद्धा त्यांना मराठी ही संपर्काची भाषा कराविशी वाटली नाही. उलटपक्षी शिंदे हे ग्वालियरला जावून सिंधिया झाले.

हा सगळा इतिहास सांगण्याचे कारण म्हणजे सध्या शालेय शिक्षणात करण्यात आलेली हिंदी भाषेची सक्ती. मराठी माणूस हा सहिष्णु आहे याचा गैरफायदा घेतला जात आहे. महाराष्ट्रात राहणारा मराठी माणूस हा सुद्धा हिंदू आहे, गुजरात मध्ये राहणारा गुजराथी माणूस सुध्या हिंदू आहे, तामिळ बोलणारा सुध्दा हिंदू आहे. 'पंजाब, सिंध, गुजरात, मराठा, द्रविड उत्कल बंग' हे आपल्या देशाच्या राष्ट्रगीतात आहे. विविधतेत एकता है नुसत्या देशाच वैशिष्ट्य नाही तर आपल्या हिंदू धर्माचे सुद्धा वैशिष्ट्य आहे. ख्रिस्ती धर्म पाळणारे हे सगळेच इंग्रजी बोलत नाहीत, ते जर्मन, फ्रेंच, स्पॅनिश इत्यादी भाषा बोलतात. अगदी भारतात तर ख्रिस्ती धर्म वाढवण्यासाठी त्यांनी तामिळ, मल्याळम आणि कोंकणी ही बोलीभाषा आत्मसात केली. ही सगळी उदाहरणे दयायचे कारण धर्म वाढवायचा असेल टिकवायचा असेल तर सर्व भाषांना सामावून घेणे गरजेचे आहे. एका समूहाची भाषा दुसऱ्या समूहावर लादून धर्म वाढू शकत नाही. पाकिस्तानमधील बंगाली बोलणारे मुसलमान हे मुसलमान असूनही भाषेच्या सक्तीमुळे वेगळे राष्ट्र झाले हा ताजा इतिहास आहे.

ज्या पद्धतीने सरकार हिंदी भाषेची सक्ती करून हिंदू समाजात फूट पाडण्याचे काम करत आहे. त्यामुळे हिंदू समाज हा एकत्र येण्याएवजी विखुरण्याचीच शक्यता अधिक आहे. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाला एक वैचारिक अधिष्ठान आहे आणि विचारांच्या आधाराव उभी झालेली ही संघटना आहे. म्हणूनच हे सगळे सांगण्याचे धाडस करीत आहे. हिंदू धर्मामध्ये फूट पाडण्याच्या या कृतीला आपण चाप बसवाल हा आमचा ठाम विश्वास आहे, म्हणून हा पत्रप्रपंच. आपण जर वेळ दिलीत तर प्रत्यक्ष भेटून आपल्या समोर भावना व्यक्त करायला नक्की आवडेल, असे या पत्राचा मजकूर आहे.

## काँग्रेस सोडण्याची वेळ काँग्रेसनेच आणली- थोपटे



**भोर, दि. २० प्रतिनिधी**

काँग्रेसचे नेते तथा भोर विधानसभा मतदारसंघाचे माजी आमदार संग्राम थोपटे यांनी काँग्रेस पक्षाला सोडचिठ्ठी देण्याचा निर्णय घेतला आहे. संग्राम थोपटे यांनी काँग्रेसच्या प्राथमिक सभासदत्वाचा राजीनामा दिला आहे. तसेच आज कार्यकर्त्यांबरोबर बैठक घेऊन थोपटे यांनी आपली पुढील भूमिका स्पष्ट केली आहे. संग्राम थोपटे हे येत्या २२ एप्रिल रोजी भारतीय जनता पक्षात प्रवेश करणार आहेत, अशी माहिती त्यांनी स्वत: पत्रकार परिषदेत दिली आहे.

काही दिवसांपूर्वी माजी आमदार रवींद्र धंगेकर यांनी शिंदेंच्या शिवसेनेत प्रवेश केला होता. त्यानंतर आता संग्राम थोपटे हे देखील काँग्रेस पक्षाला सोडचिठ्ठी देणार असल्यामुळे राज्यात काँग्रेसला मोठा धक्का बसला आहे. दरम्यान, संग्राम थोपटे यांनी पत्रकार परिषदेत बोलताना आपल्यावर काँग्रेस पक्षानेच काँग्रेस सोडण्याची वेळ आणली असल्याचंही म्हटलं आहे. तसेच आपल्याला अनेकदा डावलण्यात आल्याचा आरोपही यावेळी संग्राम थोपटे यांनी पक्षावर केला.

"आमच्या कार्यकर्त्यांचं म्हणणं आहे की तुम्ही अनेक वर्ष काँग्रेसचं काम करत आहात. मात्र, प्रामाणिकपणे काम करत असतानाही पक्षाने तुम्हाला कायम डावलण्याचं काम केलं. शेवटी तुम्हाला मतदारसंघात जनतेनी तीन वेळा संधी दिली. मतदारसंघात तुम्ही विकासाची कामे केली. पण मतदारसंघात अजून विकासाच्या कामांना गती द्यायची असेल तर आपल्याला दुसऱ्या पक्षात जावं लागेल. त्यामुळे अशा पद्धतीचा निर्णय आज झालेल्या कार्यकर्त्यांच्या बैठकीत घेतला आहे", असं संग्राम थोपटे यांनी म्हटलं आहे.

"देशात किंवा राज्यात भाजपाचं सरकार सत्तेत आहे. त्यामुळे कार्यकर्त्यांचं मत आहे की आपल्या मतदारसंघात विकास कामांना जर गती द्यायची असेल तर भारतीय जनता पक्षात प्रवेश केला पाहिजे, अशी कार्यकर्त्यांची भूमिका आहे. आता माझी वैयक्तिक भूमिका मी आधीच सांगितलं होतं की कार्यकर्त्यांशी संवाद साधल्यानंतर ठरवेन. आता कार्यकर्त्यांचं मत आहे की मी भारतीय जनता पक्षाची राजकीय भूमिका घेतली पाहिजे. तेथेच आपल्याला न्याय मिळेल", असंही संग्राम थोपटे यांनी म्हटलं.

"येणाऱ्या २२ एप्रिल रोजी भाजपात पक्ष प्रवेश होईल. या पक्ष प्रवेशाला राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, चंद्रशेखर बावनकुळे, रवींद्र चव्हाण यांच्या उपस्थितीत मुंबईत पक्ष प्रवेश होणार आहे. माझ्याबरोबर अनेक कार्यकर्ते भाजपात प्रवेश करणार आहेत", अशी माहिती संग्राम थोपटे यांनी दिली.

"मला काँग्रेसकडून कुठेही थांबवण्याचा प्रयत्न झाला नाही. खरं तर मला काँग्रेस सोडण्याची वेळ काँग्रेसनेच आणली. २००९ साली मी पहिल्यांदा या मतदारसंघातून निवडून आलो. पक्षाने मला उमेदवारी दिली आणि मी निवडून आलो. तेव्हा मी नवीन होतो. त्यानंतर २०१४ ला मी पुन्हा निवडून आलो. त्यानंतर २०१९ साली पुन्हा निवडून आलो. तेव्हा महाविकास आघाडीचं सरकार सत्तेत आलं. तेव्हा काँग्रेसला १२ मंत्रिपदे मिळाली होती. मला संधी मिळेल अशी भावना होती. पण तेव्हा मला संधी मिळाली नाही", असंही ते म्हणाले.

"त्यानंतर नाना पटोले यांनी विधानसभेच्या अध्यक्षपदाचा राजीनामा दिला होता. तेव्हा मला वाटलं होतं की मला संधी मिळेल. पण तेव्हाही मला संधी मिळाली नाही. त्यानंतर महाविकास आघाडीचं सरकार सत्तेतून गेल्यानंतर विरोधीपक्ष नेतेपदाची संधी मिळेल अशी अपेक्षा होती, पण तेव्हाही संधी मिळाली नाही. त्यामुळे कार्यकर्त्यांची भावना आता अशी झाली आहे की पुण्यासारख्या जिल्ह्यात देखील तुम्ही तीनवेळा निवडून आलात तरी देखील तुम्हाला संधी मिळाली नाही. त्यामुळे पक्ष बदलण्याचा निर्णय घेतला पाहिजे अशी भावना कार्यकर्त्यांशी झाली. त्यामुळे हा निर्णय घेतला आहे", असं संग्राम थोपटे यांनी सांगितलं आहे.

इतर आवृत्त्या : पालघर- ठाणे, नाशिक, नागपूर, अकोला, अमरावती, खामगाव, यवतमाळ, वर्धा, गडचिरोली, वाशीम, भंडारा, गोंदिया आणि चंद्रपूर महासागर

## महत्त्वाचे

## कोऱ्हाटे येथे डॉ. आंबेडकर जयंती उत्साहात साजरी

**कोऱ्हाटे ।** येथील मविप्र संचलीत जनता विद्यालय व अभिनव बालविकास मंदिर शाळेमध्ये भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती साजरी



करण्यात आली. या कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थानी विद्यालयाच्या मुख्याध्यापिका रंजना घंगाळे या होत्या आपल्या भाषणात त्यांनी बाबासाहेबांच्या शैक्षणिक, सामाजिक व राजकीय जीवनावर प्रकाश टाकला आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी देशासाठी केलेले योगदानाविषयी यथोचित माहिती सांगून सर्वांना प्रेरित केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक वरिष्ठ शिक्षक आबासाहेब शिंदे यांनी केले. सूत्रसंचालन इयत्ता सातवीच्या विद्यार्थीनी आस्था पाचोरकर व उज्वला बदादे यांनी केले तर संयोजन विद्या कदम यांनी पार पाडले. विद्यालयाच्या शिक्षिका आदिती पांडव यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या सामाजिक व राजकीय कार्याची माहिती सांगितली. विद्यार्थ्यांपैकी प्रणव मालसाने, आदित्य मालसाने, सेजल मोरे, आस्था पाचोरकर, तेजल बदादे यांनी मनोगतात त्यांना समजलेले बाबासाहेबांचे चरित्र मांडले. कार्यक्रमाची सुरुवात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून झाली यावेळी याप्रसंगी वरिष्ठ शिक्षक आबासाहेब शिंदे, नरेंद्र साळुंके तसेच सर्व सहशिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. सेजल मोरे हिने आभार मानले.

## युवकाला चाकूचा धाक दाखवून मोबाइल लांबवला

**सिडको ।** अंबड परिसरातील रामकृष्ण



नगरकडे जाणाऱ्या रस्त्यावर तीन अज्ञात तरुणांनी एका सायकलस्वार युवकाला चाकूचा धाक दाखवून त्याचा मोबाईल हिसकावून नेल्याची धक्कादायक घटना घडली. या प्रकरणी अंबड पोलीस ठाण्यात तिघांविरुद्ध गंभीर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. फिर्यादी रोशन कृष्णाप्रसाद (वय २२, रा. राजवाडा, सातपूर, मुळगाव- सल्लागाव, नालंदा, बिहार) हे दि. १८ एप्रिल रोजी सायंकाळी ७:३० वाजता त्यांच्या मित्रांसोबत सायकलवरून रामकृष्ण नगरकडे जात असताना, एक्सलो पॉईंटजवळील नाल्याच्या ठिकाणी पांढऱ्या रंगाच्या ॲक्टीवा (एम.एच.१५-एफएक्स- ९११५) गाडीतून आलेल्या तीन अज्ञात तरुणांनी त्यांना अडवले. त्यानंतर फिर्यादीच्या पोटावर चाकू लावून त्यांच्याकडील निळ्या रंगाचा मोबाईल अंदाजे किंमत रु. १०,००० असा जबरदस्तीने हिसकावून नेला. यावेळी आरोपींनी फिर्यादीस हातचापटीने मारहाण केली तसेच अश्लील शिवीगाळ व जीवे मारण्याची धमकी दिली. या घटनेनंतर दुसऱ्या दिवशी, १९ एप्रिल रोजी दुपारी २:२६ वाजता अंबड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. सपोनि दिलीप भंडे यांच्या मार्गदर्शनाखाली पुढील तपास सुरु असून, पोलीस निरीक्षक कारंडे आणि पोहवा झोले अधिक तपास करत आहेत. पोलिसांनी या तिघांचा शोध सुरु केला असून परिसरातील सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे तपासाची चक्रे वेगाने फिरवण्यात येत आहेत.

## जळीत वार्डातील निष्काळजी डॉक्टरांमुळे बालिकेचा मृत्यू

**सिडको ।** अंबड परिसरातील घरकुल योजना येथे राहणाऱ्या अमर संदीप कांबळे यांच्या एक



वर्षे सात महिन्यांच्या चिमुरडीचा मृत्यू डॉक्टरांच्या निष्काळजीपणामुळे झाला आहे. या प्रकरणी अंबड पोलिसांनी सीव्हील हॉस्पिटलमधील जळीत वार्डातील संबंधित ऑन ड्युटी डॉक्टरांविरुद्ध भादंवि कलम ३०४ (अ) नुसार गुन्हा दाखल केला आहे. दि. १४ जून २०२४ रोजी सकाळी १०:४० वाजता माहेश्वरी अमर कांबळे हिच्या अंगावर गरम पाणी पडून छाती, पोट व हात भाजले. गंभीर अवस्थेत तिला जिल्हा शासकीय रुग्णालयातील जळीत वार्डात उपचारासाठी दाखल करण्यात आले. मात्र, तेथील डॉक्टरांनी वेळेवर व योग्य उपचार न केल्यामुळे तिची प्रकृती खालावली आणि १६ जून २०२४ रोजी सकाळी ११:५५ वाजता तिचा मृत्यू झाला. या प्रकरणाची चौकशी जिल्हा शल्यचिकित्सक व जिल्हास्तरीय तज्ञ समितीकडून करण्यात आली. चौकशीत डॉक्टरांनी हलगर्जीपणा केल्याचे निष्पन्न झाल्याने अमर कांबळे यांनी अंबड पोलीस ठाण्यात तक्रार दिली. सपोनि दिलीप भंडे यांच्या तपासात गुन्हा सिद्ध झाल्याने संबंधित डॉक्टरांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही घटना वैद्यकीय व्यवस्थेतील दुर्लक्ष आणि हलगर्जीपणाचे गंभीर उदाहरण असून संबंधित डॉक्टरांवर कारवाईची मागणी जोर धरत आहे.

# पेठ येथील जिल्हा परिषद शाळेतील धक्कादायक वास्तव

## शासकीय अनास्थेत कोवळ्या विद्यार्थ्यांचे हाल

**पेठ ।** देशातील कुठलाही विद्यार्थी शिक्षण व आरोग्यापासून वंचित राहू नये त्यासाठी शासन स्तरावर जोरदार प्रयत्न सुरू असताना दुसरीकडे मात्र जिल्ह्यातील पेठ येथील जिल्हा परिषद शाळा क्रमांक १ च्या कोवळ्या विद्यार्थ्यांना अनेक दुरावस्थांचा सामना करावा लागत आहे. शिक्षण अधिकारी तसेच स्थानिक शिक्षकांच्या अक्षम्य कारभारामुळे शालेय विद्यार्थी अनेक समस्यांनी ग्रासले असून दिवसेंदिवस त्यांना अडचणींना सामना करावा लागत आहे. परिसरातील नागरिक शाळेच्या भिंतींवरच लघवी करत असल्याने या ठिकाणी घाणीचे साम्राज्य पसरले आहे.त्यामुळे ऐन उन्हाळ्यात शाळेच्या खिडक्या नउघडल्याने विद्यार्थी उकाड्याने हैरान होत आहेत. येथील विद्यार्थ्यांना शालेय पोषण आहार देखील निकृष्ट दर्जाचा दिला जात असल्याने विद्यार्थ्यांचे आरोग्य धोक्यात आले आहे.

पेठ येथील जिल्हा परिषद शाळा नंबर १ मधील विद्यार्थी विविध समस्यांनी ग्रासले असून शिक्षण अधिकारी व स्थानिक शिक्षकांच्या अक्षम्य दुर्लक्षामुळे येथील विद्यार्थ्यांचे भवितव्य धोक्यात आले आहे. या शाळेत पहिली ते चौथी पर्यंतचे वर्ग भरले जातात पहिलीच्या वर्गात ८ मुले, १५मुली आहेत,दुसरीच्या वर्गात १३ मुले १६ मुली आहेत. तिसरीच्या वर्गात १२ मुले ९ मुली आहेत, चौथीच्या वर्गात १७ मुले आणि १२ मुली असे एकूण शंभराच्या आसपास विद्यार्थी या शाळेत शिक्षण घेत आहेत. परंतु शासकीय अनास्थेचा फटका या कोवळ्या विद्यार्थ्यांना बसत असून ग्रामस्थांच्या अस्वच्छ वर्तणुकीचा त्रास विद्यार्थ्यांना सोसावा लागत आहे.

आदिवासी भागात असलेल्या या शाळेमध्ये वरिष्ठ अधिकारी कधीही भेट देत नसल्याने येथील शाळा व्यवस्थापनाच्या मनमानी कारभारामुळे विद्यार्थ्यांना त्रास सोसावा लागत आहे. मात्र सांगता येत नसल्याने या प्रकाराची कुठेही वाच्यता होत नाही.







> **“शाळेच्या मागील बाजूस नागरिक लघुशंका करत असल्याने शाळेच्या परिसरात मोठी दुर्गंधी पसरली आहे. त्यामुळे खिडक्या उघडल्या जात नाहीत. विद्यार्थ्यांबरोबर शिक्षकांना याचा त्रास सहन करावा लागत आहे. वर्ग खोलीचे काम सुरू असल्याने दोन वर्ग एकत्र बसविले जातात.**
> **– रंजना बोरसे, मुख्याध्यापिका**

परिसरातील नागरिक शाळेच्या मागे राजरोसपणे लघुशंका करत असून येथे घाणीचे साम्राज्य पसरले आहे.त्यामुळे शाळेत मोठ्या प्रमाणावर दुर्गंधी आणि डासांचा उपद्रव वाढला आहे. उन्हाळ्याचे दिवस असताना खिडक्या बंद करून विद्यार्थ्यांना उकाडा सहन करावा लागत आहे. पेठ शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी असलेल्या शाळेत विद्यार्थ्यांसाठी असलेल्या शौचालयात देखील घाणीचे साम्राज्य पसरले असून शाळा व्यवस्थापनाकडून कुठलीही स्वच्छता केली जात नसल्याने या शौचालयांचा वापर केल्याने विद्यार्थ्यांचे आरोग्य धोक्यात आले आहे. शाळेच्या प्रांगणात देखील बांधकामाचे साहित्य अस्ताव्यस्त पडलेले आहे. पेठ नगरपंचायतीचे फायबरचे ठेवलेले शौचालय,शेजारीस मोडकळीस पडलेली इमारत ,शाळेभोवती विद्यार्थ्यांना कोणती सुरक्षा नसल्याने अशैक्षणिक वातावरणात विद्यार्थी शिक्षण घेत असल्याचे विदारक चित्र दिसून येत आहे.सध्या येथील काही वर्ग खोल्यांच्या दुरुस्तीचे काम सुरू असल्याने बाकीच्या वर्ग खोल्या इतर साहित्यांनी भरून ठेवल्या आहेत.येथील अपंग समावेशित संसाधना कक्ष अक्षरशः धूळ खात पडलेला आहे. त्यामुळे अपंग विद्यार्थ्यांना दुसऱ्या वर्गात बसून शिकविले जाते.बालकांसाठी शिजवल्या जाणाऱ्या भोजनगृहाची देखील मोठ्या प्रमाणावर दुरावस्था झाली असून विद्यार्थ्यांना निकृष्ट पोषण आहार दिला जात आहे. शिक्षकांनी मुख्यालयात राहणे गरजेचे असताना काही शिक्षक नियमांचा भंग करीत शाळा सुटल्यावर आपल्या घरी निघून जातात. दोन टक्के शिक्षक सोडले तर कुठलेही शिक्षणाधिकारी किंवा शिक्षक मुख्यालय राहत नाही. तर नाशिक वरून ये-जा करणारे शिक्षक शाळा सुटण्याच्या वेळी शाळेत येत असल्याने आदिवासी विद्यार्थ्यांचे भविष्य अधांतरीत होत असल्याचे दिसून येत आहे. या शिक्षकांना वरिष्ठांचा धाक नसल्याने शाळेत मनमानी पद्धतीने कारभार सुरू आहे. त्याचा फटका विद्यार्थ्यांना बसत असल्याचे दिसून येत आहे.

## दुसऱ्यासाठी जगणाऱ्या कुऱ्हेगावच्या आशासेविका मंदाबाई धोंगडे

अनेक जण फक्त स्वतःसाठी जगत असतात दुसऱ्यासाठी कुणीही जगताना दिसत नाही. आजच्या काळात माणुसकी लोप पावत चालली



असतांना गोरगरिबांच्या सेवेतच खरी समाजसेवा समजणाऱ्या बेलगाव कुऱ्हे प्राथमिक आरोग्य केंद्रअंतर्गत असलेल्या गावपातळी वरील कुऱ्हेगावच्या रहिवासी असणाऱ्या आशासेविका मंदाबाई धोंगडे यांनी स्वतःला दुसऱ्याच्या सेवेत वाहून घेतलेले आहे. त्यांच्या उल्लेखनीय कामाबद्दल प्रहार सैनिक कल्याण संघाचे जिल्हाध्यक्ष विजय कातोरे यांनी दुसऱ्यासाठी जगणाऱ्या या रणरागिणीचा सूक्ष्म पद्धतीने शोध घेऊन इगतपुरीरत्न पुरस्कारासाठी सार्थ निवड केल्याबद्दल अभिनंदन होत आहे. कोणत्याही प्रकारचा भक्कम आधार नसतांना गेल्या १५ वर्षांपासून कशाची तमा न बाळगता आशासेविका मंदाबाई कचरू धोंगडे तळागळात आदिवासी कातकरी वस्तीवर पोहचून आरोग्य सुविधा देत असतात. रात्री अपरात्री आदिवासी महिलांना प्रसूतीसाठी दवाखान्यात घेऊन जातात. आई व बाळाची काळजी घेण्यासाठी मोठी मेहनत घेतात. त्यांच्या कामाची राष्ट्रीय आरोग्य अभियान आरोग्य विभाग जिल्हा परिषद नाशिक यांच्याकडून दखल घेऊन त्यांना अहील्याबाई होळकर पुरस्काराही मिळाला आहे. मंदाबाईंनी एकुलती एक मुलीला उच्चशिक्षित करून स्वतःच्या पायावर उभे करून एका खाजगी बँकेत कामाला लावले आहे. मंदाताईंनी महाराष्ट्र सर्टिफिकेशनचे प्रशिक्षण घेऊन आदिवासी महिलांना त्याचा फायदा मिळावा यासाठी नेहमीच प्रयत्नशील असतात. गोरगरीब रुग्णांना अत्यावश्यक सुविधा मिळाव्या यासाठी मोठी धडपड करतात. माता मृत्यू रोखणे , बाल मृत्यू कमी करणे, कार्यक्षेत्रातील आदिवासी भागात घरात प्रसूती होऊ न देता योग्य मार्गदर्शनाखाली प्राथमिक आरोग्य केंद्र, जिल्हा रुग्णालय येथे प्रसूतीसाठी पाठवतात. लसीकरण, घरपोच सेवा, आभा कार्ड, गोल्डन कार्ड काढणे, किशोरी मुलींना योग्य मार्गदर्शन, कातकरी वस्तीत आरोग्य सुविधा व जनजागृती करणे, स्तनपान, वजन, कुपोषणबाबत जनजागृती, लसीकरणपासून कुणीही वंचित राहिले नाही पाहिजे. आदिवासी महिला भगिनींना प्रसूतीबाबत योग्य मार्गदर्शन मिळावे यासाठी घरोघरी जाऊन माहिती देते. त्यांची दवाखान्यात सुखरूप प्रसूती होते याचे समाधान आहे. माता मृत्यू, बाल मृत्यू थांबविण्यासाठी जनजागृती होणे गरजेचे आहे. समाजसेवेचे काम निरंतर सुरू असून यापुढेही शेवटच्या श्वासापर्यंत काम करणार आहे, असे मंदाबाई धोंगडे यांनी सांगितले.

**– लक्ष्मण सोनवणे, बेलगाव कुऱ्हे**

## आ. छगन भुजबळांच्या हस्ते नाशिक जिल्हा खो-खो असोसिएशनच्या वेबसाईटचा शुभारंभ



**नाशिक ।** नाशिक जिल्हा खो खो असोसिएशनच्या वतीने तयार करण्यात आलेल्या वेबसाईटचा शुभारंभ राज्याचे माजी उपमुख्यमंत्री यांच्या हस्ते करण्यात आला.

एसएसके स्पोर्ट क्लब येथे आयोजित कार्यक्रमात असोसिएशनच्या www.ndkka.in या वेबसाईटचा शुभारंभ करण्यात आला. यावेळी माजी आमदार जयवंतराव जाधव,जिल्हाध्यक्ष ॲड.रवींद्र पगार, नाशिक जिल्हा खो-खो असोसिएशनचे मंदार देशमुख, सचिव उमेश आटवणे, सुनील गायकवाड, नवनाथ तांबे, आनंद गरमपल्ली, गीतांजली सावळे, उषा तांबे, कांतीलाल महाले, दत्तात्रय गुंजाळ, शानुल देशमुख, अभिमन्यू पुरस्कार विजेता दिलीप खांडवी व इतर १७ राष्ट्रीय खेळाडू व विद्यापीठ खेळाडू याप्रसंगी उपस्थित होते.



## पक्षी, प्राण्यांसाठी थोडसं धान्य-पाणी, थोडसं प्रेम..



**सिडको ।** उन्हाचा कडाका वाढत असताना निसर्गातील जीवांची होणारी फरपट थांबवण्यासाठी नवीन नाशिकमध्ये एक अभिनव उपक्रम राबवण्यात आला. राजे संभाजी क्रिडा संकुल आणि पवननगर क्रिडा संकुल तसेच नवीन नाशिक जॉगिंग क्लब यांच्या संयुक्त विद्यमाने “थोडंसं धान्य-पाणी, थोडंसं प्रेम” या उपक्रमाची सुरुवात करण्यात आली.

या उपक्रमांतर्गत चिमण्या व इतर पक्ष्यांना उन्हाळ्यात पाणी आणि अन्न मिळावे म्हणून झाडांवर घरटी बसवून, त्यात धान्य व पाण्याची सोय करण्यात आली.

उन्हाळ्याच्या तीव्रतेमुळे आजूबाजूला पक्षी तहानलेले, अन्नासाठी भटकताना दिसून येतात. अशा वेळी त्यांच्यासाठी अन्नपाणी ठेवणे ही केवळ सामाजिक जबाबदारी नसून नैतिक कर्तव्य देखील आहे. या उपक्रमाचे उद्दिष्ट म्हणजे नागरी भागातही पक्ष्यांसाठी सुरक्षित आणि पोषणदायक वातावरण निर्माण करणे. आयोजकांनी आवाहन केले की, नागरिकांनी आपल्या घराच्या गॅलरीत, परसदारी किंवा झाडांवर कृत्रिम घरटी व भांडी ठेवून अन्नपाण्याची व्यवस्था करावी. उपक्रमाच्या उद्घराटनप्रसंगी अनेक सामाजिक कार्यकर्ते, नागरिक व जॉगिंग क्लबचे सदस्य उपस्थित होते. यामध्ये बाळा धाकराव, सुनील मटाले, प्रशांत लोणारी, नितीन ढिकले, सुभाष पाटील, गजानन गवारगुर, केशव भवर, आत्माराम खरात, भाग्येश पाचारणे, संजीव बोंडे, अमोल साळवे, चेतन सोनवणे, नरसिंगा देशमुख, गोपाळ जायभावे, रवी चौधरी, सचिन दंडगव्हाळ, पंकज चांदवडकर, दत्ता डोके, भिकन पाटील, सुर्यकांत शेट्टी, स्वप्निल आव्हाड, गणेश दोंदे, योगेश सानप, यांच्यासह अनेक महिला सदस्य देखील उपस्थित होत्या. निसर्गातल्या जीवांसोबत सहअस्तित्व साधण्याचा हा प्रयत्न निश्चितच स्तुत्य आहे. प्रत्येकाने आपल्या परीने छोटा वाटा उचलला, तर निसर्ग व जीवसृष्टीचे संवर्धन शक्य आहे, असा विश्वास आयोजकांनी व्यक्त केला.

# छावा क्रांतिवीर सेनेची जंबो कार्यकारिणी जाहीर

**नाशिक ।** छावा क्रांतिवीर सेनेचा भव्य प्रवेश सोहळा आणि नाशिक जिल्हा व शहर कार्यकारिणीची घोषणा करण्यात आली. मुंबई नाका येथील संपर्क कार्यालयात छावा सेनेचे संस्थापक अध्यक्ष करण गायकर यांच्या अध्यक्षतेखाली हा सोहळा संपन्न झाला.

या बैठकीचे आयोजन नाशिक जिल्हाध्यक्ष आशिष हिरे आणि महानगरप्रमुख योगेश नाना गांगुर्डे यांनी केले होते. यावेळी पंढरपूर येथे होणाऱ्या राज्यस्तरीय अधिवेशनाच्या नियोजनावर विशेष भर देण्यात आला. यावेळी गायकर यांनी आपल्या मार्गदर्शनात सांगितले की, महाराष्ट्रभर छावा क्रांतिवीर सेना शेतकऱ्यांच्या प्रश्नांसाठी व्यापक जनआंदोलन छेडणार आहे. यामध्ये नाशिक जिल्ह्यातील सर्व पदाधिकाऱ्यांनी एकत्र येऊन आंदोलन अधिक प्रभावी करण्याचे आवाहन





त्यांनी केले. तसेच पंढरपूर अधिवेशनात मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे निर्देशही दिले. नवनियुक्त पदाधिकाऱ्यांना नियुक्तीपत्रांचे वितरण करण गायकर, जिल्हाध्यक्ष आशिष हिरे, नाशिक जिल्हा संपर्कप्रमुख आबा पाटील, जिल्हा संघटक सागर जाधव, उपजिल्हाप्रमुख कल्पेश उदावंत, डॉ.आघाडी जिल्हाप्रमुख हेमकांत चित्ते, युवक जिल्हाप्रमुख अजय कडभाने, कामगार आघाडी जिल्हाध्यक्ष राहुल काकळींज, युवक जिल्हा संपर्कप्रमुख शुभम महाले, नाशिक शहर कार्याध्यक्ष विकास घागस यांच्या हस्ते नियुक्तीपत्रे प्रदान करण्यात आली.

नवनियुक्त कार्यकारणी पुढीलप्रमाणे- सतीश आहिरे (कामगार आघाडी महानगर प्रमुख), प्रशांत लोणारी (गडकोट संवर्धन महानगर प्रमुख), योगेश आहिरे (नाशिक तालुका प्रमुख), डॉ.राकेश देवरे (डॉ. आघाडी ग्रामीण जिल्हाध्यक्ष), रवींद्र जयस्वाल (जिल्हा कार्याध्यक्ष), प्रवीण बिलयानी (जिल्हा संघटक), भगवान घुगे (शहर संघटक), गणेश वाघ (युवक शहर संघटक), हर्षद पाटील (नवीन नाशिक अध्यक्ष), अक्षय ढमाले (शहर कार्याध्यक्ष), संदीप हिरे (नवीन नाशिक उपाध्यक्ष), मनोज वाघ (शहर उपाध्यक्ष), प्रशांत चारस्कर (पंचवटी विभाग अध्यक्ष), जगदीश नेरुरकर (युवक उपजिल्हा प्रमुख), तुषार शेवाळे (शहर उपाध्यक्ष), देवा चव्हाण (युवक जिल्हा सरचिटणीस), भागेश खंडागळे (विद्यार्थी आघाडी उपाध्यक्ष), रवींद्र राजपूत (शहर चिटणीस), अभिषेक गुंजाळ (वाहतूक आघाडी उपाध्यक्ष), शुभम महाले (युवक जिल्हा कार्याध्यक्ष), सुदर्शन हिरे (जिल्हा कार्याध्यक्ष).

## ➤ महत्त्वाचे

### नाशिक विभागीय शालेय जम्परोप स्पर्धेत नाशिक जिल्ह्याचे वर्चस्व



**नाशिक ।** नाशिकच्या विभागीय क्रीडा संकुल,पंचवटी येथे (दि.२०) नाशिक विभागीय शालेय जम्प रोप स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धा मोठ्या उत्साहात संपन्न झाल्या. यांमध्ये नाशिक महानगर पालिका गट आणि नाशिक जिल्हा या गटातून सहभागी झालेल्या खेळाडूंनी आपल्या सुंदर खेळाचे प्रदर्शन करून आपले वर्चस्व प्रस्थापित केले. या स्पर्धेत ३० सेकंद स्पीड, डबल अंडर, तीन मिनिट इंडूरन्स, फ्री स्टाईल आणि ३० सेकंद स्पीड रीले या प्रकारांचा समावेश होता. यामध्ये सर्व प्रकारात नाशिकच्या खेळाडूंनी सुंदर खेळ करून विजेतेपद मिळविले. यामध्ये आराध्य कार्हेकर, राजुल लुंकड, समीक्षा डुकरे, अवनी कांबळे यांनी दोन प्रकारामध्ये सुवर्ण पदके मिळवून ही स्पर्धा गाजवली. विजेत्या खेळाडूंची राज्य स्पर्धेसाठी निवड करण्यात आली आहे. या स्पर्धा यशस्वी करण्यासाठी जिल्हा जम्प रोप असोसिएशनचे सचिव विक्रम दुधारे, राष्ट्रीय प्रशिषक तन्मय कर्णिक यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा असोसिएशनच्या पंचांनी परिश्रम घेतले. विजेत्या खेळाडूंची नावे- मुली- ३० सेक स्पीड- आराध्य कार्हेकर, डबल अंडर- राजुल लुंकड, ३ मिन इंदूररन्स- समीक्षा डुकरे, फ्रीस्टाइल- अवनी कांबळे, ३० सेक स्पीड रिले- अनुज्ञा कुशारे, समीक्षा डुकरे, मिताली शिंदे, श्रावणी शिंदे, डबल अंडर- तन्वी शिंदे, आराध्य कार्हेकर, कीर्ती शिंदे, धनश्री जावळे, मुले- ३० सेकंड स्पीड- सुबोध जावळे, डबल अंडर- अद्वित शिंदे ३ मिन इंदूरन्स- समीर भोये, फ्रीस्टाइल- नमन गंगवाल, ३० सेकंड स्पीड रिले-जिनिंग शाह,अद्वैत खैरनार, ओम मराठे,प्रतीक मानकर. डबल अंडर- आरुष जाधव, देवेश गायधानी, ओम मराठे, जिनिंग शाह.

### नाशिक सर्जिकल सोसायटीच्या अध्यक्षपदी डॉ. नागेश मदनूरकर

**नाशिक ।** आरोग्य सेवेमध्ये सर्जन ची भूमिका मोलाची असून बदलत्या तंत्रज्ञानुसार विविध उपचार पद्धतीमध्ये अमूलाग्र बदल




होत आहेत. या बदलाचा फायदा निश्चितपणे रुग्णांवर उपचार करण्यासाठी होत असल्याचे प्रतिपादन वरिष्ठ ऑन्को-सर्जन आणि मुंबई च्या एशियन कॅन्सर इन्स्टिट्यूट चे संचालक पद्मश्री डॉ. ए.एस. रमाकांत (रमन) देशपांडे यांनी काढले. ते नाशिक सर्जिकल सोसायटी च्या नूतन पदाधिकाऱ्यांच्या पदग्रहण सोहळ्यात प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. या प्रसंगी मंचावर राज्य अध्यक्ष डॉ.महेश मालू,राज्य कार्यकारणी सदस्य नंदकिशोर कटोरे,मावळते अध्यक्ष डॉ. प्रशांत मुथाळ, मावळते सचिव डॉ. सचिन देवरे,मावळते कोषाध्यक्ष डॉ.संदीप सबनीस हे मान्यवर उपस्थित होते. वरिष्ठ सर्जन डॉ.प्रमोद शिंदे यांनी वर्चुअल शुभेच्छा दिल्या. या पदग्रहण सोहळ्यात वर्ष २०२५-२६ साठी पुढील पदाधिकाऱ्यांनी सूत्रे हाती घेतली. अध्यक्ष : डॉ नागेश मदनूरकर, सचिव: डॉ. अमित केले, सहसचिव : डॉ.दिलेश भारंबे, कोषाध्यक्ष: डॉ. पराग धामणे, भावी अध्यक्ष : डॉ. कैलास मोगल, कार्यकारणी सदस्य: डॉ. जी. बी. सिंग, डॉ. संजीव देसाई स्वीकृत सदस्य- डॉ.प्रवीण नारखेडे, डॉ.प्रणित मानकरे, डॉ.विशाल पवार, डॉ.यशवंत रहाडे आदी. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. नेहा जैन आहेर यांनी केले तर आभार सचिव डॉ. अमित केले यांनी मानले.याप्रसंगी शहरातील अनेक नामवंत सर्जन उपस्थित होते

### महापुरुषांच्या विचारांचा जागर करा : डॉ. सूर्यवंशी

**नाशिक ।** क्रांतीज्योती महात्मा फुले व विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर या गुरु शिष्यांच्या विचारांचा धागा जोडणारी चार्वाकपासून संतांची परंपरा आहे. ही परंपरा सामाजिक प्रबोधन करणारी आहे. छत्रपती शिवाजी महाराज, राजर्षी शाहू महाराज, महात्मा फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा दुवा भगवान गौतम बुद्ध आणि संत कबीर आहे, असे प्रतिपादन मविप्रच्या 'आयएमआर'टी महाविद्यालयाचे संचालक डॉ. प्रशांत सूर्यवंशी यांनी केले. गंगापूर रोडवरील मविप्र समाजाचे समाजकार्य महाविद्यालय येथे महात्मा फुले व डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या संयुक्त जयंतीनिमित्त आयोजित व्याख्यानात ते बोलत होते. "महात्मा फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे समाजकार्यातील योगदान" हा व्याख्यानाचा विषय होता. याप्रसंगी समाजकार्य महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विलास देशमुख, डॉ. घनशाम जगताप, कार्यक्रम समन्वयक प्रा. चंद्रप्रभा निकम विचारमंचावर उपस्थित होते. कार्यक्रमाप्रसंगी डॉ. प्रतिभा पगार, प्रा.सुनीता जगताप, डॉ. मनिषा शुक्ल, डॉ सोनल बैरागी, डॉ.प्रतिमा पवार, डॉ. गिरीश अहिरे, डॉ. दीपक नांद्रे, डॉ. संजय गायकवाड, डॉ. प्रवीण रायते, डॉ. वर्षा भाबड, प्रा. हर्षल देशमुख, डॉ. जयश्री कदम, प्रा. वैशाली कदम, अनुजा पाटील, प्रा. राहुल ठाकरे आदी उपस्थित होते.

# धक्कादायक : ग्रामस्थांचा विरोध तरीही कामे झाल्याचे दाखवून आठ कोटींवर डल्ला

## भ्रष्टाचारात वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या सहभाग? चौकशीची मागणी



**नाशिक ।** मार्च एंडच्या नावाखाली सिंचन विभागात अनेक गैरप्रकार होत असल्याचे अनेकदा उघडकीस आले आहे. प्रत्यक्षात जागेवर काम न करता अनेकदा कोट्यवधी रुपयांची बिले लाटली गेली आहेत. मात्र यावेळी कामे प्रलंबित असताना ठेकेदाराला हाताशी धरून तब्बल ८ कोटी रुपयांचे बिले लाटण्याचा धक्कादायक प्रकार पुणगाव उपविभागात उघडकीस आला असून प्रत्यक्षात या कामाची पाहणी केली असता अनेक धक्कादायक बाबी समोर आल्या आहेत.

पुणेगाव डाव्या कालव्याच्या अस्तरीकरण आणि बांधकामाची कामे अनेक ठिकाणी प्रलंबित असताना बिले लाटण्यात आली आहे. याबाबत तक्रार देऊन वरिष्ठ अधिकाऱ्यांनी कुठलीही दखल न घेतल्याने वरिष्ठांचा देखील या भ्रष्टाचारात पूर्णपणे सहभाग असल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. सिंचन विभागातील पुणेगाव डावा कालवा उपविभागाअंतर्गत डाव्या कालव्याचे काम पूर्ण न करताच अधिकाऱ्यांनी ठेकेदारांशी संगणमत करत ३१ मार्च च्या पूर्वी तब्बल १२ कोटी रुपयांचे बोगस बील लाटण्याचा प्रयत्न करण्यात आला. याबाबतची माहिती मिळताच काही जागरूक नागरिकांनी याबाबत मुख्य अभियंता प्रकाश मिसाळ आणि महामंडळाचे वरिष्ठ अधिकारी तिरमणवार यांच्याकडे तक्रार करत सदरचे बिल कामाची पाहणी केल्याशिवाय अदा करण्यात येऊ नये अशी मागणी केली होती. मात्र दोन्ही जबाबदार वरिष्ठ अधिकाऱ्यांनी तक्रारदाराच्या तक्रारीकडे सपशेल दुर्लक्ष करून तब्बल ८ कोटी रुपयांचे बिल अदा केले आहे. त्यामुळे अधिकाऱ्यांनी संगणमताने शासकीय निधीवर डल्ला मारल्याचा आरोप केला जात आहे.




दरम्यान या प्रकरणाची माहिती घेतली असता उपअभियंत्यांनी केलेल्या अनेक गैरप्रकारां बाबत शेतकऱ्यांनी तक्रारी केल्या आहेत.काही गावांमध्ये कामा संदर्भात तीव्र विरोध होता त्यामुळे कामे झालीच नाही, तर काही ठिकाणी पोलीस बाळाचा वापर करीत शेतकऱ्यांना दडपशाही करून कामे करून घेतल्याचे दिसून आले. हा सर्व प्रकारा अतिशय धक्कादायकाने गंभीर स्वरूपाचा असताना वरिष्ठ अधिकारी मात्र या कामाकडे फिरकलेच नसल्याने संबंधित उपअभियंता यांनी मनमानी पद्धतीने कामकाज केल्याची वस्तुस्थिती समोर आली आहे. या कामाच्या संदर्भात कॉलिटी कंट्रोल विभागाच्या अधिकाऱ्यांनी देखील आक्षेप नोंदविले, कामाची गुणवत्ता निकृष्ट दर्जाची असून कामामध्ये नियमितता दिसून येत नाही. काही ठिकाणी चुकीचे मोजमाप घेतल्याचे दिसून येते. मात्र असे असताना कामाच्या ठिकाणी कुठलीही पाहणी न करता किंबहुना जितक्या रकमेचे बिल अदा करायचे आहे.तेवढे काम झाले आहे का?याची कुठलीही पडताळणी न करता तब्बल ८ कोटी रुपयांचे बिल अदा करण्यात आले आहे.क्वालिटी कंट्रोल विभागानेने घेतलेल्या अक्षेपांची कुठलीही दखल न घेता बिल सादर करून ते मंजुरी करून घेतल्याने या प्रकरणात मोठा भ्रष्टाचार झाल्याचे स्पष्ट होत आहे. हा संपूर्ण प्रकार संशयास्पद असून बिल काढण्यासाठी ठेकेदारापेक्षा अधिकारीच जास्त उतावळे असल्याचे बोलले जाते. त्यामुळे या संशयास्पद प्रकाराची त्रयस्थ यंत्रणेमार्फत चौकशी करण्याची मागणी केली जात आहे. दरम्यान याप्रकरणी वरिष्ठ अधिकाऱ्यांना प्रतिक्रिया साठी संपर्क केला असता त्यांचा संपर्क होऊ शकला नाही.

**सिंचन विभागाशी संबंधित कुठलीही तक्रार असल्यास मो. ८६०५३८४९२५ या नंबरवर संपर्क साधावा.**

# बोगस शिक्षकांवर गुन्हे मग जि प.तील 'त्या' बोगस आरोग्य सेवकांचे काय?

## वारंवार पाठराखण : वरिष्ठांची भूमिका संशयास्पद

सुधीर उमराळकर

**नाशिक ।** बनावट शिक्षक भरती प्रकट तब्बल ७९ बोगस शिक्षकांविरुद्ध गुन्हे दाखल करण्याच्या प्रकारानंतर नाशिक जिल्हा परिषद आरोग्य विभागातील 'त्या' ३५ बोगस आरोग्य कर्मचाऱ्यांचा मुद्दा चर्चेत आला आहे. आरोग्य सेवक पदासाठी आवश्यक असलेले प्रमाणपत्र सादर न करताच बेकायदेशीरपणे भरती झालेले बोगस कर्मचारी आजही शासकीय सेवेत कार्यरत आहेत. प्रशिक्षण दाखले सादर करण्याच्या अनेक संधी देऊन सुद्धा या कर्मचाऱ्यांनी आजपर्यंत कुठलेच दाखले न देता शासनाच्या सर्व प्रकारच्या सुविधा लाटल्या आहेत. गेल्या अनेक वर्षांपासून शासनाच्या डोळ्यात धुळफेक करत फसवणूक करणाऱ्या कर्मचाऱ्यांवर कारवाई कधी होणार असा सवाल उपस्थित केला जात आहे.

विनाअनुदानित शिक्षकांना अनुदानित बनविण्यासाठी काही शिक्षण अधिकारी आणि मुख्याध्यापकांनी बनावट शिक्षकांची भरती केल्याचे प्रकरण उघडकीस आल्यानंतर तब्बल ७९ शिक्षकांविरुद्ध शिक्षण उपसंचालकांच्या तक्रावरून गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.असा प्रकार राज्यातील काही शहरांमध्ये आढळून आल्याने शासकीय सेवेत कार्यरत असलेल्या बोगस कर्मचाऱ्यांचा मुद्दा पुन्हा एकदा उफाळून आला आहे. दोन महिन्यांपूर्वीच उघडकीस आलेल्या बोगस शिक्षकांच्या भरती प्रकरणानंतर नाशिक जिल्हा परिषदेतील




विविध आस्थापनांमध्ये राजरोसपणे कार्यरत असणाऱ्या बोगस अपंग आणि बोगस कर्मचाऱ्यांचा मुद्दा ऐरणीवर आला आहे. त्यामुळे आता आरोग्य विभागात कार्यरत असलेल्या 'त्या' बोगस आरोग्य सेवकांचे काय? असा सवाल उपस्थित केला जात आहे. जिल्हा परिषदेत आरोग्य सेवक पदासाठी बहुउद्देशीय प्रमाणपत्र (एमपीडब्ल्यू) सादर करणे अनिवार्य आहे. परंतु आरोग्य सेवेत कार्यरत होताना तब्बल ५५ कर्मचाऱ्यांनी हे प्रमाणपत्र न देताच शासकीय नोकऱ्या लाटल्या. याबाबतचा मुद्दा वारंवार उपस्थित होत गेला मात्र असे असताना या कर्मचाऱ्यांना कायमच वरिष्ठांकडून अभय मिळत आहे. बोगस शिक्षकांपाठोपाठ फसवणूक केली म्हणून या कर्मचाऱ्यांना देखील निलंबित करा अशी मागणी आता जोर धरू लागली आहे. बहुउद्देशीय प्रमाणपत्राचा मुद्दा प्रलंबित असताना हे सर्व कर्मचारी आरोग्य विभागात विविध पदांवर कार्यरत असून त्यांना नियमित वेतन भत्ते तसेच पदोन्नत्या देखील दिले जात आहेत. त्यापैकी काही जणांनी सदरचे प्रमाणपत्र सादर केल्याचे समजते मात्र अद्यापपर्यंत ३५ जणांनी अद्यापही प्रमाणपत्र सादर न केल्याने या कर्मचाऱ्यांबाबत

**या आरोग्य सेवकांमध्ये जवळपास ५५ कर्मचाऱ्यांचा समावेश होता. त्यापैकी काही जणांनी दाखले दिल्याचे अधिकाऱ्यांचे म्हणणे आहेत. परंतु दिलेले दाखले हे बोगस असल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. म्हणून त्याची त्रयस्थ यंत्रणेमार्फत चौकशी करण्याची मागणी केली जात आहे.**

संभ्रम निर्माण झाला आहे.त्यामुळे शासनाची फसवणूक करणाऱ्या त्या कर्मचाऱ्यांविरुद्ध कायदेशीर कारवाई करावी अशी मागणी होत आहे.

दरम्यान यापैकी काही कर्मचाऱ्यांना नोकरीत २० ते २२ वर्ष झाली असून त्यांच्याकडून प्रमाणपत्र मिळवण्यासाठी जिल्हा परिषदेच्या प्रशासनाला कायमच अपयश आले आहे. यातील आणखी एक गंभीर बाब म्हणजे यापैकी काहीजणांनी अपंग असल्याचे बोगस दाखले दिल्याची चर्चा असून वर्षानुवर्ष हे कर्मचारी एकाच ठिकाणी कार्यरत आहेत. बोगस अपंग असलेल्यांबाबत अनेक तक्रारी असतानाही त्यांना पाठीशी घातले जात आहे. यातील आणखी गंभीर बाब म्हणजे या कर्मचाऱ्यांविषयी चुकीची माहिती देऊन वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून दिशाभूल केली जात आहे. त्यामुळे शिक्षक भरती पाठोपाठ आरोग्य विभागातील या कर्मचाऱ्यांची झाडाझडती करून गुन्हे दाखल करण्याची मागणी केली जात आहे.

# मनपा नियुक्त करणार सर्वेक्षक

**नाशिक ।** महापालिकेच्या विकास आराखड्यातील आरक्षणे व लेआउट विकसित करण्यासाठी सर्वेक्षण करणे बंधनकारक असल्याने सर्वेक्षणासाठी सर्वेक्षक नियुक्त केले जाणार आहे. पाच वर्षांसाठी प्रति वर्ष पाच कोटी प्रमाणे २५ कोटी रुपये यांची तरतूद करण्यात आली असून, महासभेवर प्रस्ताव सादर करण्यात आला आहे.

महापालिका क्षेत्रात विकास करण्यासाठी विकास आराखडा मंजूर करण्यात आला आहे. शहराचा नियोजनबद्ध पद्धतीने विकास करताना इमारती, रस्ते, पदपथ, शाळा, क्रीडांगणे, दवाखाने, उद्याने, पार्क, तरण तलाव, स्मशानभूमी, दफनभूमी, गटारी, पाईपलाईन मलनिस्सारण केंद्र, जलशुद्धीकरण केंद्र, जल कुंभाचे आरक्षण विकास आराखड्यात टाकले जाते. जागामालकांना रोख किंवा टी डी आर स्वरूपात मोबदला देऊन जागा ताब्यात घेतली जाते. सार्वजनिक प्रयोजनासाठी जागेचा वापर करताना सर्वेक्षण करावे लागते. प्रास्तावित प्रकल्पांचे आवश्यक रेखांकन नकाशे तयार केले जातात सर्वेक्षणासाठी महापालिकेकडून सर्वेक्षक पथकाची नियुक्ती करण्यात आली आहे.

विकास आराखड्यातील आरक्षण क्षेत्राची मोजणी करणे क्षेत्र निश्चिती नकाशा प्रमाणिकरण डीमारकेशन करणे अभिन्यास व बांधकाम परवानगी मंजुरीसाठी डी पी रस्त्यात जाणारे क्षेत्र निश्चिती सरेषा निश्चिती करणे आरक्षण संपादनासाठी प्रस्ताव तयार करणे भूमी अभिलेख खात्यामार्फत संयुक्त मोजणी करणे विविध योजना अंतर्गत विकास कामांचे प्राकलन तयार करण्यासाठी सर्वेक्षण करणे लेआउट मधील खुल्या जागेस कंपाऊंड करण्यासाठी सुधारित सर्वेक्षण व डीमार्केशन करणे जल कुंभ बांधण्यासाठी क्षेत्र मोजणे लेवल घेणे डी मार्ट केशन करणे आधी कामे नियुक्त सर्वेक्षक यांच्याकडून केली जाणार आहेत.

# मविप्र संचालक बोरसे यांनी केला आ. कांदे यांचा सत्कार

**नांदगाव ।** आमदार सुहास कांदे यांची महाराष्ट्र शासनाच्या विमुक्त जाती व भटक्या जमाती समितीच्या अध्यक्षपदी नियुक्ती झाल्याबद्दल म. वि. प्र. समाज संस्थेच्यावतीने संचालक अमित बोरसे पाटील यांनी सत्कार केला.

नांदगाव येथील आमदार निवासस्थानी संचालक अमित बोरसे पाटील तर नांदगाव तालुक्यातील मविप्र संस्थेच्या सर्व शाखांच्या वतीने व्यवस्थापक समिती अध्यक्ष यांनी सत्कार केला. नांदगाव महाविद्यालयातर्फे शिक्षक वर्गाने, औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतर्फे शालेय समिती



अध्यक्ष सुनील बोरसे यांनी तर आदर्श प्राथमिक शाळेच्या वतीने शालेय समितीचे अध्यक्ष राजाराम गवांदे यांनी कांदे यांचा सत्कार केला. कांदे यांनी सर्वांचे आभार मानत मतदारसंघाच्या विकासासाठी मी सदैव कटिबद्ध असल्याचे सांगितले. या प्रसंगी मविप्र समाज संस्थेचे संचालक, ज्येष्ठ सभासद, शिक्षक,मुख्याध्यापक उपस्थित होते. दत्तात्रय भिलोरे यांनी सूत्रसंचालन केले.

# एस.एस.के सॉलीटेअर 'बुटिक, हॉटेल ॲण्ड स्पा' या नवीन वास्तूचा शुभारंभ







**नाशिक ।** येथील पर्यटन उद्योगाला चालना देण्यासाठी हॉटेल्स इंडस्ट्रीज अतिशय उपयुक्त आहे. नाशिकमध्ये धूर ओकणारे उद्योग नको तर सेवा क्षेत्रात काम करणाऱ्या उद्योगांना प्राधान्य हवं असं मत माजी उपमुख्यमंत्री छगन भुजबळ यांनी आज व्यक्त केले. एस एस के सॉलिटेअर हॉटेलच्या उद्घाटन समारंभात प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. व्यासपीठावर शिरपूरचे आमदार अमरीशभाई पटेल, पोलीस आयुक्त संदीप कर्णिक, डॉ. राजश्री कुटे, शैलेश कुटे उपस्थित होते.


## शैलेश कुटे यांचा हॉटेल व्यवसायात विक्रम

यावेळी भुजबळ म्हणाले की, जगात अनेक देश असे आहेत की, ज्या ठिकाणी पर्यटन आणि सेवा क्षेत्रावर आधारित काम करत असल्याने ते प्रसिद्ध झाले आहेत. नाशिक शहराला अतिशय उत्तम असे हवामान लाभले असून पर्यटन आणि सेवा क्षेत्राला मोठा वाव आहे. नाशिकच्या पर्यटन उद्योगाला चालना देण्यासाठी हॉटेल्स इंडस्ट्री अतिशय उपयुक्त आहे. त्यामुळे नाशिकमध्ये धूर ओकणारे उद्योग नको, तर सेवा क्षेत्रात काम करणाऱ्या उद्योगांना प्राधान्य हवं. नाशिक मध्ये आता एस एस के हा ब्रँड तयार झाला असून हा ब्रँड आता नाशिकबाहेर मेट्रो शहरे आणि परदेशात सुद्धा जावा अशा शुभेच्छा त्यांनी दिल्या. श्री. भुजबळ यांच्या हस्ते उदघाटन करण्यात आले.

यावेळी आ. देवयानी फरांदे, विशेष सरकारी वकील अजय मिसर, रतन लथ, माजी आमदार नितीन भोसले, रवींद्र पगार, शरद आहेर, रंगोली कुटे, सलोनी कुटे, भाजपचे नेते लक्ष्मण सावजी, गणेश कांबळे, प्रशांत कोटकर, सतीश सोनवणे, मामा ठाकरे, अशोक सावंत, शेखर निकुंभ, नितीन साळवे, पी. डी. जाधव, दादा माळी, दैनिक 'महासागर'चे संपादक प्रा. जयंत महाजन, प्रा. मीरजकर, उद्योजक साहेबराव साळुंखे, माणिकराव काठे, सुभाष कडलग, राजू पटेल, समीर रकटे, जगूभाई पोतदार, शशीभाई कन्सारा यांच्यासह राजकीय, सामाजिक, शैक्षणिक, उद्योग, सांस्कृतिक, क्रीडा यासह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

### नाशकात धूर ओकणारे कारखाने नको

मुख्यमंत्री अजितदादा पवार, जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील या दोघांच्याही अनुपस्थितीत संपूर्ण कार्यक्रमाची धुरा छगन भुजबळ यांनी अतिशय खुबीने सांभाळली. विशेष म्हणजे नर्मविनोदी शैलीत त्यांनी नाशिकच्या विकासाचा आढावा देखील घेतला. शैलेश कुटे यांनी आता पून्हा एकदा राजकारणात यायला हरकत नाही असा सल्ला देखील त्यांनी दिला. नाशिक शहरात अतिशय सुंदर असे हॉटेल्स तयार होत आहे ही अतिशय आनंदाची बाब आहे. नाशिक हे अतिशय मोठं शहर असून नाशिकचं वातावरण अतिशय अल्हाददायक असून धार्मिक महत्त्व देखील या शहराला आहे. त्यामुळे याठिकाणी पर्यटनाला देखील मोठा वाव आहे. त्यामुळे याठिकाणी धूर ओकणारे कारखाने नको तर इतर उद्योग व्यवसायाला चालना मिळवा यासाठी आपले प्रयत्न आहे. याठिकाणी बोट क्लब, उड्डाणपूल, विमानतळ, रिंग रोड, धार्मिक स्थळांचा विकास अशी अनेक महत्वाची विकासकामे याठिकाणी करण्यात आली असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले. या कार्यक्रमात शैलेश कुठे यांनी आपल्या दोन्ही मुलींच्या कर्तबगारीचा आढावा देखील सादर केला. कार्यक्रमाला नाशिककरांनी मोठी गर्दी केली होती.











sukritforyou@ gmail.com





अशोकायन...



प्रा. अशोक सारडा, मेहकर.
(९४२२३९४३३९)

# [illegible]





[illegible]

## [illegible]





[illegible]

## [illegible]

[illegible]

आज का अंदाज
सोमवार २१ मार्च २०२५
जबरदस्त पास होणारे चान्सेस
पत्थर फोड एकच

कल्याण बाजार

| 2 | 5 | 6 | 9 |
|---|---|---|---|
| 147 | 168 | 240 | 126 |
| 390 | 230 | 358 | 289 |
| 679 | 357 | 790 | 478 |
| 21 | 51 | 60 | 90 |
| 23 | 53 | 64 | 94 |
| 27 | 57 | 68 | 98 |

मुंबई बाजार

| 3 | 4 | 5 | 8 |
|---|---|---|---|
| 157 | 239 | 159 | 350 |
| 490 | 455 | 258 | 567 |
| 580 | 338 | 357 | 116 |
| 32 | 42 | 51 | 81 |
| 30 | 40 | 57 | 87 |
| 39 | 49 | 56 | 86 |


२१ एप्रिल २०२५
सर्व बाजारांसाठी

| | | | |
|---|---|---|---|
| 02 | 12 | 53 | 83 |
| 05 | 15 | 56 | 86 |
| 07 | 18 | 54 | 84 |

कल्याण, मुंबई आणि सर्व बाजारासाठी 60 पानांचा चार्ट मिळेल. 100 टक्के खात्रीशीर.
प्रो. बालाजी कुमार
9822486034

[illegible]

# शब्दकोडे क्रमांक २०९१




**आडवे शब्द :-**
१) रक्षा
२) अहोरात्र
५) संतापी
७) वारा
९) भ्रम, भ्रांती
१०) सुरुच्या झाडाचा चीक
११) माळ, सर
१२) धोड्यावरून मारलेली फेरी
१४) विल्हेवाट, निकाल
१५) तात्काळ
१८) मोठी वाटी
१९) हत्तीचा छावा
२०) सत्ता
२१) रजत, रुपे
२३) सुंदर तरुणी
२५) मुलाची किंवा मुलीची मुलगी
२७) उपकार
२८) हातात हात घेऊन अभिवादन करण्याची क्रिया
३१) लाजणारा
३२) माल साठविण्याची जागा
३३) कच्चा लाकडी पूल
३७) नट्टापट्टा
३९) एकावर एक रचलेले
४१) रस्ता
४३) कुबेराचा सेवक
४४) माकडातील एक प्रकार
४५) वाकडा नसलेला
४७) पर्वत, वस्तू
४८) मलई
४९) एक प्रश्नार्थक शब्द
५१) न सुटणारा विळखा
५१) वयाने जास्त असलेली वधू
५३) झाडावर पिकू लागलेले फळ
५४) छोटा सुरा
५५) शोक, दुःख
५७) दरवाजा
५९) ठोक, हाण
६१) यात्रेस जाणे
६२) दुर्दशा, दुश्चिन
६३) आश्चर्याची गोष्ट,
६४) देव
६६) कारस्थान
६७) खून, वध, हत्या
६९) अस्तावस्त पसरलेले सामान
७०) चामखीळ
७२) दुप्पट
७४) श्रीकृष्णाचे एक नाव
७७) छातीत होणारा भीतीचे ठोके
७९) लाज
८०) हजार शेराचे वजन

**उभे शब्द :-**
१) मीठ
२) ढीग
३) पूर्ण चोवीस तास
४) नवऱ्याची दुसरी पत्नी
५) प्रफुल्लित, टवटवीत
६) कडक
७) जमीन खोदण्याचे एक हत्यार
८) नवरदेव
९) स्तुती करणारा,
१३) पोट (हिं.)
१४) एक द्विदल धान्य
१६) नवऱ्याची वा बायकोची आई
१७) खटला दाखल करणारा
२१) भला
२२) हेलकावा, चळवळ
२४) मनातील कल्पना
२६) तळे, सरोवर
२८) हेळसांड दुर्लक्ष
२९) लग्नातील वर-वधू
३०) व्रत
३४) पंकज
३५) पवित्र
३६) पुत्र, मुलगा
३८) मावा
४०) द्रवपदार्थ
४१) घोंगड्या विणणारी जमात
४२) ढाळ, उतरणे, टेकडी
४६) रक्कम, ठराविक पैसे
४८) ** बुद्धी नाठी
५०) काळजी, फिकीर
५१) माकडांना खेळविणारा
५२) मिश्रण, भेसळ
५३) बाजीप्रभुंनी लढविलेली जागा
५४) अरुंद तोंडाचे चिंचोळे पात्र
५६) शेतकऱ्यांना सरकारने दिलेले कर्ज
५८) बैलाचा सण
५९) रेलचेल विपुलता
६०) श्रीमंत
६१) घाव, प्रहार
६२) गुन्हा
६५) श्वासोच्छ्वासाची क्रिया
६६) कशा प्रकारचा
६७) शस्त्र,
६८) वाकण्याची क्रिया
६९) पडणे
७०) पुष्परस
७१) सडलेला
७३) बगळा
७५) अवस्था, स्थिती
७६) थाळी
७८) एक छोटे चर्मवाद्य

(उत्तर उद्याच्या अंकात)

## मागील शब्दकोड्याचे उत्तर



# परिवहन महामंडळाच्या कार्यशाळेच्या आवारात आग

## नऊ रिक्षा, दोन चारचाकी जळून खाक



**नाशिक ।** शहरात सातत्याने आग लागण्याच्या घटना घडत आहे.त्यामध्ये मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान होत आहे. पेठ रोडवरील एस टी कार्यशाळेतील आग शॉट सर्किट झाल्याने आग लागली असावी, अशी शक्यता वर्तवली जात आहे. या घटनेत नऊ रिक्षा, दोन चारचाकी जळून खाक झाल्या. घटनेची माहिती मिळताच पंचवटी अग्निशामक दलाच्या दोन बंबांच्या साहाय्याने आग आटोक्यात आणण्यात आली.

आरटीओकडून कारवाई करण्यात आलेली वाहने खाक झाली. पेठ रोडवरील घटनेत जळालेल्या नऊ रिक्षा, एक टेम्पो ट्रॅव्हलर आणि एक स्विफ्ट डिझायर अशी अकरा वाहने नाशिक आरटीओने विविध गुन्ह्यात जप्त केल्याची माहिती पुढे येत आहे. पेठरोड परिसरात महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाची विभागीय कार्यशाळा असून, कार्यशाळेच्या मोकळ्या जागेत आरटीओ कारवाई करण्यात आलेली वाहने लावली जातात. रविवारी (दि.20) रोजी दुपारी कार्यशाळेच्या आवारात गवतात उभ्या असलेल्या वाहनांच्या ठिकाणी धूर निघू लागला आणि काही वेळात या ठिकाणावरील झाडाचा पाचोळा पेटल्याने वाहने आगीच्या भक्ष्य स्थानी सापडली. ही आग कार्यशाळेच्या कर्मचाऱ्यांच्या निदर्शनास येताच त्यांनी अग्निशमन दलाला माहिती कळविली.

घटनेनंतर अग्निशमन दलाच्या जवानांनी घटनास्थळी धाव घेत दोन पाण्याच्या बंबांच्या साहाय्याने आग विझविण्यात आली. यावेळी पंचवटी अग्निशमन दल प्रभारी केंद्रप्रमुख संजय कानडे, संतोष मेहेंदरे, मनोहर गायकवाड, विजय शिंदे, विजय पाटील व अग्निशमन दलाचे कर्मचारी घटनास्थळी उपस्थित होते.

## नाशिकमधील उन्हाच्या झळा...



नाशिकमध्ये सध्या ऊन भयानक तापू लागले आहे. रविवार कारंजा परिसरातील चौकात दुपारच्या वेळी उन्हामुळे रस्ते ओस पडलेले असून, रहदारी तुरळक प्रमाणात दिसून येत आहे. (छाया : सोज्ज्वळ साळी)

## ➤ महत्त्वाचे

### फळपीक विमा योजना लाभासाठी शेतकऱ्यांनी ई-पीक पाहणी करावी

**नाशिक ।** पुर्नरचित हवामानावर आधारित फळपीक विमा योजना जिल्ह्यात बजाज अलायन्झ जनरल इन्शुरन्स कंपनीद्वारे राबविण्यात येत आहे. जिल्ह्यात आंबिया बहार सन २०२४-२५ मध्ये द्राक्ष, डाळिंब, केळी, काजू, आंबा, स्ट्रॉबेरी या ६ फळ पीकांसाठी हवामान धोक्याच्या निकषानुसार राबविण्यात येत आहे. शेतकऱ्यांनी या योजनेत सहभागी होण्यासाठी २५ एप्रिल २०२५ पर्यंत फळपीकांची ई-पीक पाहणी करावी, असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी अभिमन्यू काशिद यांनी पत्रकान्वये केले आहे. पुर्नरचित हवामानावर अधारित फळपीक विमा योजनेत सहभागी होणाऱ्या शेतकऱ्यांना ई-पीक पाहणी करणे बंधनकारक आहे. ज्या शेतकऱ्यांनी फळपीक विमा योजनेत सहभाग घेतला आहे परंतु फळ पीकांची ई-पीक पाहणी डिजीटल क्रॉप सर्वे मोबाईल ॲपद्वारे केलेली नाही त्यांनी ती २५ एप्रिल २०२५ पर्यंत पूर्ण करावी अन्यथा १२ जून २०२४ रोजीच्या शासन निर्णय मधील तरतुदीनुसार ७/१२ उताऱ्यावर ई-पीक पाहणी नोंद नसलेले सर्व पीक विमा अर्ज रद्द करण्यात येतील. या बाबतीत सविस्तर माहिती शासन निर्णयात नमूद केलेल्या आहेत, असेही प्रसिद्धी पत्रकात नमूद केले आहे.

### बाळासाहेब ठाकरे क्रीडांगणाची दुरवस्था

**सिडको ।** शहरातील महत्त्वाच्या



क्रीडांगणांपैकी एक असलेल्या स्वर्गीय हिंदू हृदय सम्राट बाळासाहेब ठाकरे क्रीडांगण उद्यानाची दुरावस्था झाली आहे अनेक वर्षापासून उद्यानातील भिंतींची रंगरंगोटी न झाल्याने त्या खराब झाल्या आहेत मुख्य प्रवेशद्वारही कपड्याने बांधून ठेवले आहे नागरिक शिवसेनेच्या पदाधिकाऱ्यांनी महापालिकेकडे याबाबत तक्रार केली शहरात आगामी सिंहस्थ कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर कामे सुरू आहेत अशा परिस्थितीत या क्रीडांगणाचे सुशोभीकरण आवश्यक आहे.

### प्रभाग ३१ मध्ये पाणीटंचाईच्या झळा

**इंदिरानगर ।** प्रभाग क्रमांक ३१ मधील हॉटेल एक्सप्रेस इन च्या मागे असणाऱ्या विजय लक्ष्मी नगर मधील नागरिकांना विकतचे पाणी घेण्याची वेळ आली आहे गेली दोन वर्ष या भागातील विशेषता विजय लक्ष्मी रोड हाऊस मधील ४९ पेक्षा जास्त कुटुंबांनी विकतचे पाणी घेतले. महापालिका स्तरावर माजी नगरसेवकांना सोबत घेऊन महिला आणि नागरिकांनी निवेदने दिली त्यानंतर या भागात गतवर्षी पाण्याची पाईपलाईन टाकण्यात आली पहिले दोन महिने व्यवस्थित पाणी मिळाले त्यानंतर मात्र पाण्याचा दाब कमी होत गेला सध्या तर दिवसाआड पाणी मिळत आहे ते देखील अवघ्या काही मिनिटांसाठी येते त्यामुळे तळ टाक्या भरत नाहीत परिणामी नागरिकांना पदरमोड करून खासगी टँकर बोलावून तहान भागवावी लागत आहे सुरळीत असलेला पाणीपुरवठा अचानक टोकडा किंवा थेट बंद होण्याच्या मार्गावर का आला असा प्रश्न नागरिकांनी उपस्थित केला असून येथील पाणी समस्या सोडविण्याची मागणी निकिता पाटील राधा पाटील मयुरी वाजे प्रियांका वाजे छाया शेलार आदींनी केली आहे.

# महापालिकेच्या महिला प्रशिक्षणाच्या चौकशीसाठी लवकरच स्वाक्षरी मोहीम

## 'दायित्व' सेवाभावी संस्थेचा निर्णय





**नाशिक ।** महापालिकेच्या महिला व बालकल्याण विभागातर्फे राबविण्यात आलेल्या महिला प्रशिक्षण कार्यक्रमाबाबत संशयाचे गडद काळे ढग निर्माण झाले आहे. या प्रशिक्षण कार्यक्रमाची सर्वत्र कुचर्चा सुरू आहे. त्यामुळे 'दूध का दूध आणि पानी का पानी' हे सिद्ध करण्यासाठी मनपा आयुक्तांनी या संपूर्ण कार्यक्रमाची सखोल चौकशी करण्याची गरज आहे. मनपाने चौकशी न केल्यास या विरोधात लवकरच स्वाक्षरी मोहीम राबविण्यात येईल, अशी माहिती दायित्व बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेने पत्रकानव्ये दिली आहे.

शहरातील गरजू आणि सामान्य-गरीब महिलांसाठी महापालिकेच्या महिला व बालकल्याण विभागाच्यावतीने महिला प्रशिक्षण कार्यक्रम राबविण्यात आला आहे. महिलांना विविध कोर्सेसचे प्रशिक्षण देऊन त्यांना स्वतःच्या पायावर उभे करण्यासाठी मोलाची भूमिका निभावणाचा गोमटा प्रयत्न महापालिका करीत आहे यात शंका नाही; परंतु गैरकारभार आणि टक्केवारीत अडकल्याने या प्रशिक्षण कार्यक्रमाची पार रया गेली. या प्रशिक्षण कार्यक्रमाची सर्वत्र कुचर्चा झाली. काही सामाजिक कार्यकर्ते, संस्था-मंडळांनी आयुक्तांकडे तक्रारी केल्या. ज्या वेळेस आयुक्त मनीषा खत्री यांनी आयुक्तपदाची सूत्रे स्वीकारली त्यावेळेला त्यांनी या संपूर्ण प्रकरणाची सविस्तर चौकशी करण्याचे ठोस आश्वासन दिले होते; परंतु तीन-चार महिने उलटूनही अद्याप आयुक्तांनी दिलेल्या आश्वासनाची पूर्तता केली नाही. त्यामुळे हे कथित प्रकरण पुन्हा चर्चेत आले आहे.

महिला प्रशिक्षणातील गैरकारभाराच्या रंगलेल्या खमंग चर्चेचे कवित्व अजूनही सुरूच आहे. नवीन आर्थिक वर्ष सुरू होऊनही या बहुचर्चित प्रकरणाची चौकशी अद्याप सुरू झालेली नसल्याने याबाबतच्या चर्चांना अधिक उत आला आहे. कार्यतत्पर आयुक्तांकडून या कथित प्रकरणाची सखोल चौकशी होऊन दोषींना शास्ती होईल, अशी बाळगलेली मनीषा अखेर फोल ठरली आहे. आयुक्त मनीषा खत्री यांनी या प्रकरणाची सविस्तर व सखोलपणे चौकशी करून दोषींवर कारवाई करण्याचा शब्दही दिला होता. आता तरी आयुक्त या प्रकरणाच्या मुळाशी जाऊन त्याची तड लावणार का याकडे शहरातील समस्त महिला वर्गाचे लक्ष वेधले आहे. महापालिकेच्या महिला व बालकल्याण विभागातील संबंधितांपासून तर त्यावर नियंत्रण ठेवणाऱ्या घटकांपर्यंत साऱ्यांकडेच संशयाची सुई फिरते. या संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषींवर कडक शास्ती करण्याची मागणी दायित्व संस्थेच्या अध्यक्ष किरण भावसार, खजिनदार सीमा परदेशी, सचिव आकाश भावसार, निमंत्रित सदस्य संदीप जोजारे, तुषार जाधव, प्रशांत बोरसे, अनिल येवले, ईश्वर वाघमारे, सोनाली भालेराव, वैष्णवी परदेशी, समन्वयक दीपक भावसार आदींनी केली आहे. या संदर्भात आयुक्तांची भेट घेऊन तक्रार करणार असून, चौकशी न झाल्यास या संपूर्ण प्रकरणाच्या विरोधात स्वाक्षरी मोहीम राबविणार असल्याचे सांगितले आहे.

# आरोग्यासाठी योग जीवन पद्धती उपयुक्त : डॉ. मंडलिक



**नाशिक ।** आयुष्यातील विविध समस्यांमधून मार्ग काढण्यासाठी योगनिद्रा, ओमकार साधना करावी. जीवनातील कोणत्याही क्षेत्रात कार्यरत असताना शारीरिक, मानसिकरीत्या आरोग्यपूर्ण व सक्षम रहाण्यासाठी 'योग जीवन पद्धती' उपयुक्त आहे. भगवद्गीतेचे आचरण करावे व गीता तत्वज्ञान अंगिकारावे असे मार्गदर्शन योगतज्ज्ञ डॉ. विश्वास मंडलिक यांनी केले.

योगविद्या गुरुकुल अंतर्गत योग विद्याधामतर्फे 'योग जीवन पद्धती' या विषयावर शिबिराचे आयोजन करण्यात आले. कालउ रविवारी (दि.२०) कॉलेज रोडवरील बीवायके महाविद्यालयाच्या प्रांगणातील गुरुदक्षिणा सभागृहात झालेल्या या शिबिरात विविध कार्यक्रम झाले. प्रारंभी पंचवटी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ निरीक्षक मधुकर कड, डॉ. विश्वास मंडलिक, पौर्णिमा मंडलिक, संदर्भसेवा रुग्णालय रक्तपेढीचे प्रमुख डॉ.पुरुषोत्तम पुरी आदी मान्यवरांच्या यांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने उद्घाटन करण्यात आले. डॉ. सुरेश सूर्यवंशी, डॉ. कविता कांबळे, ॲड. गीतांजली बागुल, डॉ.सतीश वाघमारे, प्रदीप पाटील, सुनंदा जरांडे, अशा तज्ज्ञांनी विविध विषयांवर मार्गदर्शन केले. दुपारी १२ वाजता प्रमुख मार्गदर्शक डॉ. विश्वास मंडलिक यांनी योग जीवन पद्धती ' या विषयावर मार्गदर्शन केले. विश्वकल्याण प्रार्थना व योग पसायदानाने कार्यक्रमाचा समारोप झाला. मानसी शिंदे यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. सानिका मंगळवेढेकर यांनी आभार मानले. प्रकल्प प्रमुख अध्यक्ष मनोहर कानडे, गौरव शिरोडे, मानसी देशपांडे, बाबासाहेब शिंदे आणि सर्व कार्यकारिणी सदस्यांनी या कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी परिश्रम घेतले.

# श्रीराम आढाव यांना डॉक्टरेट पदवी प्रदान

**ओझर ।** भारतीय जनता पक्षाचे जेष्ठ सदस्य तथा




माजी सैनिक श्रीराम निवृत्ती आढाव यांना 'गांधी पीस फाऊंडेशन, नेपाळ'च्या वतीने मानद डॉक्टरेट पदवी प्रदान करण्यात आली. जळगाव येथे आयोजित कार्यक्रमात भाजपा आमदार सुरेश (राजुमामा) भोळे यांच्या हस्ते माजी सैनिक श्रीराम आढाव यांना मानद डॉक्टरेट पदवी प्रदान करण्यात आली. 'डॉक्टरेट इन एक्सलेंट सर्विस इन आर्मड फोर्सेस अ‍ॅन्ड ह्युमिनिटी सर्व्हिसेस' विषयावर आढाव यांना मानद डॉक्टरेट पदवी प्रदान करण्यात आली. दरम्यान श्रीराम आढाव यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

# थॅलेसेमिया आजारावर जनजागृती अभियान राबविणे गरजेचे : डॉ. सोनवणे

## थॅलेसेमिया जनजागृती कार्यशाळा संपन्न



**नाशिक ।** नाशिक शहरातील माध्यम विभागातील प्रतिनिधी, तसेच पत्रकारिता शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांनसाठी जनकल्याण रक्तकेंद्र व नाशिक तालुका मराठी पत्रकार संघाच्यावतीने थॅलेसेमिया जनजागृती अभियान कार्यशाळा जनकल्याण रक्तकेंद्र या ठिकाणी संपन्न झाली.

थॅलेसेमिया हा आजार सामान्यतः जन्मापासूनच आढळतो. साधारणतः लहान वयातच या विकाराची लक्षणे आढळतात. शरीरात रक्तनिर्मितीत अडथळा आल्यानं थॅलेसेमिया हा आजार उद्भवतो. थॅलेसेमिया हा रक्तातील अनुवांशिक विकार आहे. थॅलेसेमिया अनुवांशिक विकार असल्यानं तरुण-तरुणींनी विवाह करण्यापूर्वी तसंच अपत्य जन्माला घालण्यापूर्वी थॅलेसेमियाशी संबंधित चाचणी करून घेणे आवश्यक आहे. जनकल्याण रक्तकेंद्राच्या माध्यमातून या सर्व थॅलेसेमिया बाधित रुग्णांना नेहमी मदत केली जाते. रक्तदानाचे महत्व पटवून रक्तदानासाठी प्रोत्साहित करणे गरजेचे आहे. ज्या लोकांना थॅलेसेमिया आहे अशा प्रत्येक व्यक्तीपर्यंत पोहचण्याचे आपले उद्दिष्ट असले पाहिजे, असे प्रतिपादन रक्तकेंद्राच्या मुख्य रक्तसंक्रमण अधिकारी डॉ. सुजाता सोनवणे यांनी आपल्या मनोगतात आपले मत व्यक्त केले. प्रास्ताविक मनोगतात विवाह जमवताना आपण वधू वराची कुंडली बघतो, एकमेकांचे ३६ गुण जमतात कि नाही तेही आपण बघतो या प्रमाणेच ३७ वा गुण आपण थॅलेसेमिया चाचणी करून तपासाला पाहिजे हेही तितकेच महत्वाचे आहे. जनकल्याण रक्तकेंद्राच्या वतीने १८३ थॅलेसेमिया बालकांना मोफत रक्तपुरवठा केला जातो. जनकल्याण रक्तकेंद्राच्या माध्यमातून रक्तदान शिबिरे वाढविणे, रक्तदान व थॅलेसेमिया विषयावर जनजागृती अभियान राबविणे. नवयुवकांना प्रबोधन करून रक्तदान प्रक्रियेबद्दलची त्यांची भीती घालवणे, गैरसमज दूर करणे आणि या सामाजिक उपक्रमात त्यांना जोडून घेणे, असे प्रतिपादन जनकल्याण रक्तकेंद्राच्या सहकार्यवाह डॉ. रश्मी दिवे यांनी आपल्या प्रास्ताविक मनोगतात केले. यावेळी जनकल्याण रक्तकेंद्राचे कार्यवाह शैलेश पंडित, प्रशासकीय अधिकारी विनय शौचे, नाशिक जिल्हा पत्रकार संघाचे कार्याध्यक्ष दिनेश ठोमरे, तालुकाध्यक्ष करणसिंग बावरी, सरचिटणीस सुरेश पिंगळे, उपाध्यक्ष भैयासाहेब कटारे, संजय परदेशी, संघटक उल्लास शिरसाठ, प्रकाश जोशी, पंकज पाटील, संदीप नगरकर, अनिल केदारे आदी पदाधिकारी उपस्थित होते.

# पाकिस्तानचा रडीचा डाव : कुलभूषण यांना अपील करण्याचा अधिकार नाकारला

**इस्लामाबाद, दि. २० वृत्तसंस्था**

पाकिस्तानच्या तुरुंगात असणारे भारतीय नागरिक कुलभूषण जाधव यांच्याबाबत पाकिस्तानने पुन्हा एकदा रडीचा डाव खेळला आहे. त्यांना अपील करण्याचा अधिकार नाकारला आहे. ते भारतीय गुप्तहेर असल्याचा पाकिस्तानचा आरोप आहे. कुलभूषण जाधव यांना आंतरराष्ट्रीय न्यायालय (आयसीजे) ने केवळ कॉन्सुलर ॲक्सेस देण्याचा आदेश दिला होता. त्या निर्णयामध्ये त्यांना अपील करण्याच्या अधिकाराचा उल्लेख नव्हता, असे पाकिस्तानच्या संरक्षण मंत्रालयाने म्हटले आहे.



माजी पंतप्रधान इम्रान खान यांच्या अटकेनंतर ९ मे २०२३ रोजी पाकिस्तानमध्ये हिंसाचार उसळला होता. यावेळी झालेल्या निदर्शनांमध्ये सहभागी असल्याचा आरोपींच्या खटल्याची सुनावणी सर्वोच्च न्यायालय करत होते. भारतीय नागरिक कुलभूषण जाधव यांना अपील करण्याचा अधिकार देण्यात आला आहे. यावर उत्तर देताना संरक्षण मंत्रालयाचे वकील ख्वाजा अहमद यांनी लष्करी न्यायालयाने हिंसाचारासाठी दोषी ठरवलेल्यांना अपील करण्याचा अधिकार देण्यात आलेला नाही, असे न्यायालयास सांगितले. तसेच त्यांना केवळ आयसीजेच्या आदेशानंतर कॉन्सुलर ॲक्सेस देण्यात आला असल्याचेही त्यांनी नमूद केले, असे वृत्त पाकिस्तानमधील दैनिक 'डॉन'ने दिले आहे.


कॉन्सुलर ॲक्सेस म्हणजे, एखाद्या परदेशी देशात अटक झालेल्या किंवा ताब्यात घेतलेल्या नागरिकाला त्यांच्या देशाच्या दूतावासाच्या अधिकाऱ्यांशी (कॉन्सुलर अधिकारी) संपर्क साधण्याचा अधिकार. आंतरराष्ट्रीय न्यायालयाने तो कुलभूषण जाधव यांना दिला आहे. त्याचबरोबर मृत्युदंडाच्या शिक्षेचा पुनर्विचार करण्याचेही आवाहन केले होते. याचबरोबर आंतरराष्ट्रीय न्यायालयाने पाकिस्तानला कुलभूषण जाधव यांच्या त्यांच्या शिक्षेचा आणि मृत्युदंडाच्या शिक्षेचा पुनर्विचार करण्याचे आवाहन केले होते.

# गाझातील पत्रकाराचा लग्नापूर्वी हवाई हल्ल्यात मृत्यू

**गाझा, दि. २० वृत्तसंस्था**

मृत्यू हा अटळच. जगण्यातील अंतिम सत्यही. गेली दीड वर्ष मृत्यूला सोबतच तिचे रोजच जगणं सुरु होतं. या काळात गाझामधील युद्धाची भयावह दृश्य ती कॅमेराबद्ध करुन जगासमोर आणत होती. त्याचबरोबर सर्वसामान्यांचे उद्ध्वस्त झालेले जीवन जगाला सांगण्यासाठीही ती वचनबद्ध होती. काही दिवसांपूर्वीचे तिने आपली अंतिम इच्छाही सोशल मीडियाच्या माध्यमातून व्यक्त केली होती. दुर्दैवाने तिची अंतिम इच्छा 'ब्रेकिंग न्यूज' झाली. गाझामधील युद्धाचे प्रत्येक दृश्य दीड वर्ष आपल्या कॅमेऱ्यात टिपणारी २५ वर्षीय पत्रकार फातिमा हसौना हवाई हल्ल्यात ठार झाली. या हल्ल्यात फातिमासोबत तिच्या १० नातेवाईकांचाही मृत्यू झाला असल्याचे वृत्त 'द गार्डियन'ने दिले आहे.

गाझा ही मागील दीड वर्षापासून युद्धभूमी बनली आहे. इस्त्रायल आणि हमाच्या संघर्षात या परिसराच्या अक्षरश: चिंधडया उडाल्या आहेत. येथील धोक्यांची जाणीव असूनही फातिमाने तिथे घडणाऱ्या सर्व गोष्टी तिच्या कॅमेऱ्यात रेकॉर्ड केल्या. गाझाची कहाणी जगाला सांगण्यासाठी वचनबद्ध राहिली.



फातिमाने गेल्या १८ महिन्यांपेक्षा अधिक काळ तिने युद्ध, हवाई हल्ले, स्वतःच्या घराची उद्ध्वस्तता, सततचे विस्थापन आणि आपल्या ११ नातेवाइकांच्या मृत्यूचे दस्तावेज सादर केले होते. तिने सोशल मीडियावर लिहिलेल्या पोस्टमध्ये म्हटलं होतं की, " मला एक गौरवशाली मृत्यू हवा आहे. मला फक्त ब्रेकिंग न्यूज किंवा समूहातील एक नंबर बनायचे नाही. मला असा मृत्यू हवा आहे, जो जगाला एकू येईल. याचा प्रभाव काळानुसार टिकेल. मला अशी प्रतिमा हवी आहे जी काळ किंवा जागेने दफन केली जाऊ शकत नाही."

फातिमाचे लग्न अवघ्या काही दिवसांवर येवून ठेपले होते. २५ वर्षांची फातिमा हस्सुना उत्तर गाझामधील त्यांच्या घरावर झालेल्या इजरायली हवाई हल्ल्यात ठार झाली. त्यांच्या गर्भवती बहिणीसह कुटुंबातील आणखी १० सदस्यही या हल्ल्यात ठार झाले. इजरायली लष्कराने सांगितले की हा हल्ला हमासच्या सदस्याचा खात्मा करण्यासाठी करण्यात आला होता.

या हल्ल्याबाबत इस्त्रायली सैन्याने म्हटले आहे की, इस्त्रायली सैनिक आणि नागरिकांवर हल्ल्यांमध्ये सहभागी असलेल्या हमास सदस्याला या हल्ल्यात लक्ष्य करण्यात आले. फातिमाच्या मृत्यूच्या २४ तास आधी घोषणा करण्यात आली होती की इस्त्रायली हल्ल्यादरम्यान गाझामधील फातिमा हसौनाच्या जीवनावर आधारित चित्रपट कान्ससोबत आयोजित फ्रेंच स्वतंत्र चित्रपट महोत्सवात प्रदर्शित केला जाणार आहे. फातिमा हवाई हल्ल्यात ठार होण्याच्या २४ तास आधीच तिच्या जीवनावर आधारित एक माहितीपट फ्रान्समधील कान्स फिल्म महोत्सवाच्या समांतर चालणाऱ्या एका स्वातंत्र्य महोत्सवात दाखवला जाणार असल्याची घोषणा झाली होती. इराणी दिग्दर्शक सेपिदेह फारसी यांनी तयार केलेला "Put Your Soul on Your Hand and Walk" हा माहितीपट गाझामधील लोकांचे दुःख आणि हस्सुना व फारसी यांच्यातील व्हिडीओ संवादांमधून त्यांच्या रोजच्या जीवनाची कहाणी सांगतो.

गाझामधीलच पत्रकार मिकदाद जमील यांनी जनतेला आवाहन केलं " तिचे फोटो बघा, तिचे शब्द वाचा— गाझाचं जीवन, युद्धातील मुलांचं दुःख तिच्या कॅमेऱ्याच्या माध्यमातून अनुभवा."त्यांच्या मृत्यूनंतर Cannes Acid फिल्म फेस्टिव्हलने एका निवेदनात सांगितलं, "आम्ही एक असा चित्रपट पाहिला, जिथे त्या तरुणीचा जीवनसत्त्व उत्स्फूर्त ठसा एखाद्या चमत्कारासारखा वाटतो. तिचं हास्य आणि चिकाटी जादूई होती. ती साक्षीदार होती, फोटो घेत होती, बॉंब असूनही अन्न वाटत होती, दुःख सहन करत होती, उपाशी होती. तिच्या प्रत्येक दर्शनाने आम्हाला आनंद झाला, पण तिच्या सुरक्षिततेची भीतीही वाटली."

# पोलीस कॉन्स्टेबलची सटकली सहकाऱ्यावर झाडल्या 11 गोळ्या

**बेतिया, दि. २० वृत्तसंस्था**

बिहारमध्ये बेतिया शहरातील पोलीस लाईन परिसरात खळबळजनक घटना घडली आहे. एका पोलिस कॉन्स्टेबलने त्याच्या सहकारी कॉन्स्टेबलची ११ गोळ्या झाडून हत्या केली. सोनू कुमार असे मृत कॉन्स्टेबलचे



नाव आहे. याप्रकरणी संशयित आरोपी कॉन्स्टेबल परमजीतला पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. ही थरारक घटना पोलीस लाईनमध्ये सर्वांच्या डोळ्यांसमोरच घडली.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, कॉन्स्टेबल परमजीत आणि त्याचा सहकारी पोलिस कॉन्स्टेबल सोनू कुमार यांच्यात काहीतरी कारणावरून जोरदार वाद झाला. वाद इतका वाढला की, परमजीत याने सर्व्हिस रायफल काढली आणि सोनू कुमारवर अंदाधुंद गोळीबार सुरू केला. चेहऱ्यावर एकामागून एक ११ गोळ्या झाडल्याने सोनूचा जागीच मृत्यू झाला. घटनास्थळी उपस्थित असलेल्या इतर पोलिसांनी सांगितले की परमजीतने २० पेक्षा जास्त फायरिंग राउंड केले. काही दिवसांपूर्वी दोघांचीही सिक्टा पोलीस स्टेशनमधून बेतिया पोलीस लाईनमध्ये बदली झाली होती आणि त्यांना त्याच युनिटमध्ये तैनात करण्यात आले होते.

या घटनेनंतर कॉन्स्टेबल परमजीत रायफल घेऊन पोलीस लाईनच्या छतावर चढला. त्यामुळे पोलिसांना त्याला नियंत्रित करणे कठीण झाले. नंतर, पोलिसांनी त्याला अटक केली. घटनेची माहिती मिळताच चंपारण रेंजचे डीआयजी हरकिशोर राय घटनास्थळी पोहोचले. त्यांनी संपूर्ण प्रकरणाचा सखोल तपास सुरू केला. मृत कॉन्स्टेबल सोनू कुमारचा मृतदेह सध्या पोलिस बॅरेकमध्ये आहे. तर परमजीतची एसडीपीओ विवेक दीप मुफस्सिल पोलीस ठाण्यात चौकशी सुरू आहे.

# ओमर अब्दुल्ला संतापले- जायचे होते दिल्लीला, पण विमान उतरले जयपूरला

**नवी दिल्ली, दि. २० वृत्तसंस्था**

जम्मू आणि काश्मीरचे मुख्यमंत्री ओमर अब्दुल्ला विमानाने दिल्लीला दिल्लीला निघाले, पण विमान कंपनीच्या गैरव्यवस्थापनामुळे त्यांना जयपूरमध्ये उतरवले. ज्यामुळे मुख्यमंत्री अब्दुल्ला चांगलेच संतापले. रात्री १ वाजता जयपूर विमानतळावर उतरवल्याने अब्दुल्ला यांनी दिल्ली विमानतळावर जोरदार टीका केली आहे.



शनिवारी रात्री इंडिगोचे विमान ओमर अब्दुल्ला यांना घेऊन जम्मूहून दिल्लीला रवाना झाले. परंतु दिल्ली विमानतळावर विमानांची गर्दी असल्याने विमान उतरण्यासाठी जागा उपलब्ध नव्हती. त्यामुळे विमान दिल्लीत उतरू शकले नाही आणि विमान थेट जयपूरला वळवण्यात आले. तिथे रात्री उशिरा १ वाजता विमान पोहचले. विमानातून उतरल्यानंतर मुख्यमंत्री ओमर अब्दुल्ला यांचा पारा चढला. त्यांनी एक सेल्फी शेअर करत सोशल मीडियावरून संतप्त भावना व्यक्त केल्या. "दिल्ली विमानतळ म्हणजे एक संपूर्ण गोंधळाची परिस्थिती आहे (अश्लील भाषेसाठी क्षमस्व, पण आता सभ्य बोलण्याच्या मूडमध्ये नाही). जम्मूहून निघाल्यानंतर ३ तास हवेत फिरवून आम्हाला जयपूरला वळवलं. आता मी विमानाच्या जिन्यावर उभा राहून थोडी ताजी हवा घेत आहे. इथून कधी निघणार, काहीच कल्पना नाही." असे अब्दुल्ला यांनी पोस्टमध्ये म्हटले आहे. दरम्यान, शनिवारी श्रीनगर विमानतळावर खराब हवामानामुळे सहा विमाने रद्द करण्यात आली. यामुळे जम्मू विमानतळावरही अनेक प्रवासी अडकले होते. तिथे उडानांच्या विलंब व रद्द होण्याच्या प्रकारांमुळे पूर्ण गोंधळाचं वातावरण होतं आणि शेकडो प्रवासी अडकल्यामुळे परिस्थिती अधिकच बिघडली होती.

# कमी दरामुळे टोमॅटो उत्पादकांमध्ये नाराजी

## गुंतवलेले भांडवल वसूल होणे कठीण

**पुणे, दि. २० प्रतिनिधी**



आंबेगाव तालुक्याच्या पूर्व भागात उन्हाळी हंगामातील टोमॅटो तोडणी सुरू झाली आहे. उत्पादनदेखील चांगले निघत आहे. परंतु, टोमॅटोला बाजारभाव मात्र समाधानकारक मिळत नाही. त्यामुळे टोमॅटो पिकासाठी गुंतवलेले भांडवल वसूल होणार नसल्याने टॉमेटो उत्पादक शेतकर्यांमध्ये नाराजी दिसत आहे.

तालुक्याच्या पूर्व भागात उन्हाळी हंगामात टोमॅटो पीक शेतकरी मोठ्या प्रमाणावर घेतात. टोमॅटोला बाजारभावाची साथ मिळाली शेतकर्यांना लाखो रुपये मिळतात. परंतु, गेल्या अनेक दिवसांपासून टॉमेटोला समाधानकारक बाजारभाव मिळत नाही. टोमॅटो पिकासाठी शेतकर्यांनी लाखो रुपयांचे भांडवल गुंतवले आहे. परंतु, सध्या मिळणार्या बाजारभावातून भांडवल वसूल होणे कठीण आहे.

सध्या पारगाव परिसरात टोमॅटो तोडणी सुरू आहे. शेतकरी टोमॅटोची प्रतवारी करून नारायणगाव (ता. जुन्नर) येथील बाजारात टोमॅटो विक्रीसाठी पाठवत आहेत. परंतु, तेथे टोमॅटो क्रेटला (20 किलो) दोनशे रुपयांपर्यंत बाजारभाव मिळत आहे. हा बाजारभाव शेतकर्यांना अपेक्षित नाही. टोमॅटो पिकासाठी शेतकर्यांनी रोपे, खते ,औषधे बाग बांधणी यासाठी लाखो रुपयांचे भांडवल गुंतविले आहे. त्यामुळे सध्या मिळणारा दर शेतकर्यांची निराशा वाढवणारा ठरत आहे.

**यंदा टोमॅटो उत्पादनात प्रचंड वाढ**

आंबेगाव तालुक्यात बहुतांशी भागांमध्ये उन्हाळी हंगामात टोमॅटो पीक मोठ्या प्रमाणावर घेतले जाते. यंदा टोमॅटो पिकाला शेवटपर्यंत मुबलक प्रमाणात पाणी मिळाले. तसेच अनुकूल हवामानाची साथ मिळाली. कीड रोगांचा प्रादुर्भाव कमी झाला. त्यामुळे उत्पादनात प्रचंड वाढ झाली असल्याचे शिंगवे येथील टोमॅटो उत्पादक शेतकरी बाळासाहेब वाव्हळ यांनी सांगितले.

# शेख हसीनांच्या अडचणी वाढणार

## बांगलादेशाने जारी केली रेड कॉर्नर नोटीस



**ढाका, दि. २० वृत्तसंस्था**

बांगलादेशच्या माजी पंतप्रधान शेख हसीना यांच्या अडचणीत वाढ होऊ शकते. कारण येथील पोलिसांनी शेख हसीनांवर कारवाई करण्यासाठी सर्व शक्ती पणाला लावली आहे. बांगलादेश पोलिसांच्या राष्ट्रीय केंद्रीय ब्युरोने इंटरपोलला १२ लोकांविरुद्ध रेड नोटीस जारी करण्याची विनंती केली आहे. या यादीत शेख हसीना यांचेही नाव आहे.

मीडिया रिपोर्टनुसार, ७७ वर्षीय शेख हसीनी मागील ऑगस्टपासून भारतात राहत आहेत. राजधानी ढाका येथे झालेल्या हिंसक विद्यार्थ्यांच्या निदर्शनांनंतर हसीना बांगलादेश सोडून निघून गेल्या. यानंतर त्यांनी भारतात आश्रय घेतला. बांगलादेशातील विद्यार्थ्यांच्या हिंसक आंदोलनामुळे शेख हसीना यांचा पक्ष अवामी लीगची १६ वर्षाची राजवट संपुष्टात आली.

एनसीबी न्यायालये, सरकारी वकील किंवा तपास संस्थांकडून आलेल्या अपिलांच्या आधारे कारवाई करते. सहाय्यक पोलिस महानिरीक्षक एनामुल हक सागर यांनी पोलिस मुख्यालयात माध्यमांशी बोलताना सांगितले की, "हे अर्ज तपासादरम्यान किंवा कोणत्याही चालू खटल्याच्या कार्यवाहीत उद्भवणाऱ्या आरोपांच्या संदर्भात दाखल केले आहेत. इंटरपोलद्वारे एखाद्या व्यक्तीला तात्पुरते अटक करण्यासाठी रेड नोटिसचा वापर केला जातो. जेणेकरून प्रत्यार्पण किंवा इतर कायदेशीर प्रक्रिया पार पाडता येईल. इंटरपोल परदेशात राहणाऱ्या फरार आरोपींचा माग काढण्यास मदत करते आणि एकदा पुष्टी झाली की, संबंधित अधिकाऱ्यांसोबत माहिती शेअर केली जाते, असे देखील पोलिसांनी म्हटले आहे.

# GTT डेटा च्या हॅकाथॉनद्वारे विद्यार्थ्यांना कौशल्ये आणि नोकऱ्यांची संधी




GTT डेटा सोल्यूशन्स लिमिटेड ही बीएसई-सूचीबद्ध, तंत्रज्ञान-आधारित व्यवसाय सोल्यूशन्स पुरवणारी कंपनी आहे, जी मध्यम आकाराच्या कंपन्यांना एआय-चालित ERP आणि डिजिटल ट्रान्सफॉर्मेशन टूल्सच्या माध्यमातून सक्षम बनविण्यावर लक्ष केंद्रित करते. भारताच्या उदयोन्मुख टेक्नोलॉजी हब्सकडे लक्ष वेधण्यासाठी, GTT डेटा सोल्यूशन्स वेस्टर्न महाराष्ट्रात आतापर्यंत झालेल्या सर्वात मोठ्या इंटरकॉलेजिएट हॅकाथॉनपैकी एकाचे आयोजन करत आहे — "Code | Compete | Conquer" या थीमखाली आयोजित हा एक एतिहासिक सोलो कोडिंग स्पर्धा आहे.

सांगली येथे होणाऱ्या या स्पर्धेत सांगली, कोल्हापूर, सोलापूर आणि सातारा यासह नऊ जिल्ह्यांतील ७५ कॉलेजमधून १,५०० हून अधिक विद्यार्थी सहभागी होत आहेत — पारंपरिक टेक रिक्रूटमेंटमध्ये दुर्लक्षित राहणाऱ्या टियर २ आणि टियर ३ शहरांतील अपार आणि सुप्त कौशल्यांचा ठसा उमठवण्यासाठी ही अनोखी संधी आहे.कौशल्ये आणि प्रत्यक्ष जगातील संधी यामधील अंतर कमी करण्यासाठी हा हॅकाथॉन डिझाइन करण्यात आला आहे. विद्यार्थ्यांना नाविन्यपूर्ण विचार, समस्यांचे वास्तववादी निराकरण आणि इंडस्ट्री-ओरिएंटेड कोडिंगसाठी प्रोत्साहित केले जात आहे. विजेत्यांना GTT कडून थेट नोकरीच्या संधी, इंडस्ट्री-मान्यताप्राप्त प्रमाणपत्रे, विशेष प्रशिक्षण प्रोग्राम्स आणि बरेच काही मिळणार आहे.ही फक्त एक स्पर्धा नाही — ही भारताच्या लपलेल्या टेक टॅलेंटला जागतिक व्यासपीठावर आणण्याची आणि नाविन्यपूर्ण विचारांचे विकेंद्रीकरण करण्याची मोहीम आहे.

लोकार्थ

# टी20 मुंबई लीग सीझन 3 चा चेहरा रोहित शर्मा



मोठ्या उत्साहात परतणाऱ्या T20 मुंबई लीगसाठी मुंबई क्रिकेट असोसिएशनने भारताचा कर्णधार आणि मुंबईकर रोहित शर्माची सीझन ३ चा चेहरा म्हणून घोषणा केली. 26 मेपासून सुरू होणारी ही भारतातील आघाडीची स्थानिक फ्रँचायझी आधारित T20 लीग, जबरदस्त थरार, तीव्र स्पर्धा आणि मुंबईतील सर्वोत्तम क्रिकेट प्रतिभेचं प्रदर्शन देणार आहे.ही घोषणा मुंबईत झालेल्या पत्रकार परिषदेत करण्यात आली, ज्यात रोहित शर्मा, MCA अध्यक्ष अजिंक्य नाईक, तसेच अपेक्स कौन्सिल आणि लीग गव्हर्निंग कौन्सिलचे सदस्य तसेच संघ चालक उपस्थित होते. या कार्यक्रमात MCA ने दोन नवीन संघांचीही घोषणा केली आणि रोडवे सोल्यूशन्स इंडिया इन्फ्रा लिमिटेड व रॉयल एज स्पोर्ट्स अँड एंटरटेन्मेंट यांचे फ्रँचायझी चालक म्हणून स्वागत केले. याच वेळी रोहित शर्मने सिझन 3 चा भव्य ट्रॉफीचा अनावरणही केला. MCAच्या आयोजनात ही लीग सहा वर्षांच्या विश्रांतीनंतर पुन्हा एकदा परतत आहे आणि Season 3 ला आतापर्यंत प्रचंड प्रतिसाद मिळाला आहे, ज्यामध्ये 2800 हून अधिक खेळाडूंनी नोंदणी केली आहे. ही लीग मुंबईतील उदयोन्मुख क्रिकेट प्रतिभेसाठी एक महत्त्वपूर्ण व्यासपीठ म्हणून किती महत्त्वाची आहे, हे यावरून स्पष्ट होते.

# आशीष सराफ आरटीएक्सचा प्रॅट अँड व्हिटनी व्हाईस प्रेसिडेंट म्हणून नियुक्त

आरटीएक्सचा व्यवसाय असलेल्या प्रॅट अँड व्हिटनीने आज भारतातील प्रॅट अँड व्हिटनीचे व्हाईस प्रेसिडेंट आणि कंट्री हेड पदावर आशीष सराफ यांची नियुक्ती केल्याचे घोषित केले.प्रॅट अँड व्हिटनीनेचे सर्वात वरिष्ठ इन-कंट्री लीडर या नात्याने आशीष भारतातील सर्व प्रकारची धोरणात्मक वृद्धी आणि परिवर्तनाच्या प्रयत्नांचे नेतृत्व करतील. ते प्रॅट अँड व्हिटनीचे इन-कंट्री इंजिनियरिंग, पुरवठा साखळी, ग्राहक सेवा, संचालन आणि डिजिटल परिवर्तन केंद्रांच्या वृद्धीसाठी आणि आखणीसाठी जबाबदार असतील.आशीष या आधी एरोस्पेस, संरक्षण, बायोमेट्रिक्स, सायबर सिक्युरिटी आणि ग्लोबल कॅपेबिलिटी सेंटरसहित सर्व थेल्स इंडिया व्यवसायांसाठी डायरेक्टर आणि अध्यक्ष म्हणून काम करत होते. तेथून ते प्रॅट अँड व्हिटनीमध्ये सामील झाले आहेत.आशीष सराफ यांच्याकडे या उद्योगातील आणि कन्सल्टिंग क्षेत्रातील 20 पेक्षा जास्त वर्षांचा अनुभव आहे. एरोस्पेस, संरक्षण, बायोमेट्रिक्स आणि उत्पादन क्षेत्रात त्यांनी व्यापक काम केले आहे. थेल्समधील आपल्या कार्यकालापूर्वी आशीष सराफ यांनी एअरबस आणि टाटा-सिकॉर्स्की संयुक्त उद्यमात विविध नेतृत्त्वाच्या भूमिका बजावल्या आहेत.



# स्विगी इन्स्टामार्टची 'मॅक्ससेव्हर' योजना

भारतातील आघाडीची क्विक कॉमर्स प्लॅटफॉर्म स्विगी इन्स्टामार्ट, जी नुकतीच देशातील 100 शहरांमध्ये विस्तारली आहे, तिने 'मॅक्ससेव्हर' या नव्या इन-ॲप फीचरचा शुभारंभ केला आहे. हे फीचर खास करून वापरकर्त्यांना जास्त बचत आणि अधिक मूल्य देण्यासाठी तयार करण्यात आले आहे. हे फीचर ग्राहकाच्या खरेदी अनुभवात सहजपणे समाविष्ट करण्यात आले असून, प्रत्येक ग्राहक आपोआप 'मॅक्ससेव्हर' योजनेत सामील होतो. ठराविक ऑर्डर अमाउंटनंतर ग्राहकांना ₹500 पर्यंतची अतिरिक्त बचत मिळण्याचा लाभ मिळू शकतो. स्विगी मॅक्ससेव्हरच्या मदतीने ग्राहकांना सर्व श्रेणींमधील वस्तूंवर सर्वोत्तम किंमतीचा लाभ घेता येतो. सध्या स्विगी इन्स्टामार्टकडे 35,000 पेक्षा जास्त उत्पादने उपलब्ध आहेत, ज्यामध्ये किराणा सामान, दैनंदिन वापराच्या वस्तू, इलेक्ट्रॉनिक्स, स्मार्टफोन्स, फॅशन, मेकअप, खेळणी आणि इतर अनेक गोष्टींचा समावेश आहे आणि ही सर्व उत्पादने केवळ 10 मिनिटांत घरपोच दिली जातात.हे फीचर ग्राहकांची रोजची खरेदी अधिक परवडणारी आणि फायदेशीर बनवण्यासाठी तयार करण्यात आले आहे.

संकलन –संयोजन
**सुबोध रणशेवरे**
संपर्क -९८३३१४६३५६
ईमेल -subodh.ranshevre @rediffmail.com

# सर्वोच्च न्यायालयाचा अपमान

## निशिकांत दुबे अडचणीत; कारवाई होणार?

**नवी दिल्ली, दि. २० वृत्तसंस्था**

भाजप खासदार निशिकांत दुबे यांनी सर्वोच्च न्यायालय आणि सरन्यायाधीश (सीजेआय) संजीव खन्ना यांच्याबाबत दिलेल्या वादग्रस्त विधानावरुन मोठा वाद उफाळून आला आहे. एकीकडे विरोधक या विधानावरुन भाजपवर टीका करत आहेत, तर दुसरीकडे सर्वोच्च न्यायालयाच्या एका वकिलाने ॲटर्नी जनरल (एजी) यांना पत्र लिहून 'अवमानाची कारवाई' सुरू करण्याची परवानगी मागितली आहे.

विरोधी पक्षांनी, विशेषतः काँग्रेसने यावरुन भाजपवर निशाणा साधण्यास सुरुवात केली आहे. तर दुसरीकडे भाजप अध्यक्षांनी पुढे येऊन स्पष्ट केले की, निशिकांत दुबे यांच्या विधानाशी भाजपचा काहीही संबंध नाही. भाजपने या मुद्द्यापासून स्वतःला दूर केल्यानंतर काँग्रेसचे सरचिटणीस जयराम रमेश यांनी या मुद्द्यावरुन भाजपर टीका केली.



जयराम रमेश म्हणाले की, 'भारताच्या सरन्यायाधीशांवर भाजपच्या खासदारांनी केलेल्या आक्षेपार्ह वक्तव्यापासून मावळत्या भाजप अध्यक्षांनी स्वतःला दूर ठेवण्याचे विशेष महत्त्व नाही. हे खासदार वारंवार द्वेषपूर्ण भाषणे देण्यासाठी कुप्रसिद्ध आहेत. समुदाय, संस्था आणि व्यक्तींवर हल्ला करण्यासाठी त्यांचा वापर केला जातो. भाजपच्या अध्यक्षांनी दिलेले स्पष्टीकरण म्हणजे नुकसान भरुन काढण्याशिवाय दुसरे काहीही नाही. यामुळे कोणीही फसणार नाही.'

'भाजप अध्यक्षांनी त्यांच्याच पक्षात उच्च पदावर असलेल्या एका अत्यंत प्रतिष्ठित व्यक्तीने न्यायव्यवस्थेवर वारंवार केलेल्या अस्वीकार्य टिप्पण्यांवर पूर्णपणे मौन बाळगले आहे. भाजप या विधानांना पाठिंबा देते का? जर संविधानावर अशा सतत होणाऱ्या हल्ल्यांना पंतप्रधान मोदींची कोणतीही मूक मान्यता नाही, तर ते या खासदारावर कठोर कारवाई का करत नाहीत? नड्डाजींनी त्यांना कारणे दाखवा नोटीस बजावली का?' असा सवाल जयराम रमेश यांनी विचारला.

1971 च्या कायद्यानुसार, न्यायालयाचा अवमान कायदा कलम 15(ब) अंतर्गत सर्वोच्च न्यायालयाचा अवमान केल्याबद्दलची कारवाई केवळ ॲटर्नी जनरल किंवा सॉलिसिटर जनरल यांनी परवानगी दिल्यानंतरच सुरू करता येते. आता निशिकांत दुबे यांच्याविरोधात कारवाईची मागणी जोर धरत आहे.

# लग्नावरून परतणाऱ्या तरुणांची कार गॅस टॅंकरला धडकली, २ ठार

**जम्मू, दि. २० वृत्तसंस्था**

जम्मू-पठाणकोट राष्ट्रीय महामार्गावरील सांबाच्या महेश्वर लष्करी क्षेत्राजवळ रविवारी सकाळी झालेल्या भीषण अपघातात दोन तरुणांचा मृत्यू झाला तर एक जखमी झाला. हे तिघेही तरुण कारमधून प्रवास करत होते, ते लग्न समारंभाला उपस्थित राहून परतत होते, तेव्हा अचानक, सांबाच्या लष्करी क्षेत्राजवळ, कार पार्क केलेल्या गॅस टॅंकरशी धडकली.

या अपघातात दोन तरुणांचा जागीच मृत्यू झाला तर तिसरा तरुण गंभीर जखमी झाला. कारची टक्कर इतकी जोरदार होती की ती टॅंकरखाली पूर्णपणे अडकली. पोलिसांनी जखमी तरुणाला सांबा जिल्हा रुग्णालयात दाखल केले आहे. मृतांचे मृतदेह शवविच्छेदनासाठी सांबा जिल्हा रुग्णालयाच्या शवागारात ठेवण्यात आले आहेत. त्याचबरोबर पोलिसांनी याप्रकरणी गुन्हा दाखल करून पुढील कारवाई सुरू केली आहे.

मृतांची ओळख पटली असून ते हिमाचल प्रदेशचे रहिवासी आहेत आणि शुभम श्रीवास्तव हे उत्तर प्रदेशचे रहिवासी आहेत. जखमी तरुणाचे नाव राकेश कुमार असे आहे. तो किशनपूर तहसील बिल्लावार जिल्हा कठुआ येथील राम दासचा मुलगा आहे. जखमी तरुणावर सांबा जिल्हा रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

# सरकारी नोकरदार असलेल्या पत्नीच्या छळामुळे अभियंता पतीने केली आत्महत्या

**इटावा, दि. २० वृत्तसंस्था**

उत्तर प्रदेशातील इटावा जिल्ह्यातून पुन्हा एकदा पत्नीने पतीचा छळ केल्याचे प्रकरण समोर आले आहे. सरकारी नोकरदार असलेल्या पत्नीच्या छळामुळे अभियंता पतीने आत्महत्या केली आहे. पत्नीच्या छळाला कंटाळून अभियंत्याने हे टोकाचे पाऊल उचलले आहे.



उत्तर प्रदेशातील इटावा येथील हॉटेलमधील एका खोलीतून अभियंत्याचा मृतदेह सापडला. या संपूर्ण प्रकरणाशी संबंधित एक व्हिडिओ देखील समोर आला आहे. यामध्ये मृत तरुण अभियंता मोहित यादव म्हणत आहे की, "जेव्हा तुम्हाला हा व्हिडिओ मिळेल तेव्हा मी या जगात नसेन. जर मुलांसाठी कायदा असता तर कदाचित मी हे चुकीचे पाऊल उचलले नसते. माझ्या पत्नी आणि सासरच्या लोकांकडून होणारा मानसिक छळ मी सहन करू शकलो नाही. म्हणूनच मी हे पाऊल उचलत आहे. बाबा, आई मला माफ करा".

मोहित यादव एका सिमेंट कंपनीत फील्ड इंजिनिअर म्हणून कामाला होता. तो औरैया जिल्ह्यातील दिबियापूरचा रहिवासी होता. काही दिवस रिलेशनशिपमध्ये राहिल्यानंतर त्याने प्रिया यादव नावाच्या मुलीशी लग्न केले. त्यांचा संसार सुखाने सुरु होता. दरम्यान प्रियाची बिहारमधील समस्तीपूर येथे प्राथमिक शिक्षिका म्हणून निवड झाली. त्यानंतर प्रियाच्या वागणुकीत बदल झाला. आई आणि भावाच्या सांगण्यावरून तिने पती मोहितचा मानसिक छळ करण्यास सुरुवात केला. तिने माझ्यावर घर आणि जमीन तिच्या नावावर करण्यासाठी दबाव आणण्यास सुरुवात केली होती.

जीवन संपविण्यापूर्वी मोहित यादव याने एक व्हिडिओ शेअर केला. या मध्ये म्हटले होते की, "माझी पत्नी प्रिया यादव हिच्या आईने प्रियाला गर्भपात करण्यास भाग पाडले. तिने दागिने आणि साड्या स्वतःकडे ठेवल्या आहेत. माझी पत्नी मला धमकी देत आहे की, घर आणि मालमत्ता माझ्या नावावर हस्तांतरित केली नाही तर मला आणि माझ्या कुटुंबाला हुंड्याच्या खोट्या आरोपात अडकवेल. मी मानसिक छळाला कंटाळलो आहे. आता माझ्या मृत्यूनंतर मला न्याय मिळाला नाही, तर माझी राख नाल्यात फेकून द्यावी. आई आणि बाबा, मला माफ करा. मी तुमच्या अपेक्षा पूर्ण करू शकलो नाही".

घटनेची माहिती मिळाल्यानंतर पोलिसांनी संपूर्ण प्रकरणाचा तपास सुरू केला आहे. मृताचा भाऊ तरण प्रताप म्हणाला की, "माझा भाऊ मोहित नोएडा येथील एका सिमेंट कंपनीत काम करायचा. प्रिया नोएडामध्येच राहत होती. दोघांमध्ये एक नाते निर्माण झाले. यानंतर, सात वर्षे रिलेशनशिपमध्ये राहिल्यानंतर दोघांनी लग्न केले. कुटुंबाच्या संमतीने हे लग्न झाले होते. लग्नानंतर तीन महिने सगळं ठीक होतं, त्यानंतर प्रियाने मोहितला त्रास द्यायला सुरुवात केली. तिने मोहितला कुटुंबापासून वेगळे केले आणि नंतर मालमत्ता तिच्या नावावर करण्यासाठी दबाव आणू लागली होती."

महासागर NASHIK
Printed, published and owned by Shrikrishna Tansukhdas Chandak at S. R. publication, Mohan - Arjun Compund, Godown No. 8, 9 & 10, Near Ghartan Pada, Vaishali Nagar Last Bus Stop, Dahisar (E),Mumbai - 400068 and Published From 'ANANDI', KOTWAL PARK, TILAKWADI, APP. VED MANDEER, DHAMANKAR CORNER, NASHIK 422002 , Editor - SHRIKRISHNA TANSUKHDAS CHANDAK Executive Editor- Sanju Pawar, Resident Editor- Jayant Mahajan.

महासागर नाशिक
हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी एस. आर. प्रिंटर्स, मोहन अर्जुन कंपाऊंड, गोडावून नं. ८,९,१०, घरटन पाडा, वैशाली नगर, दहिसर ईस्ट, मुंबई येथे मुद्रीत करून 'आनंदी', कोतवाल पार्क, टिळकवाडी, वेद मंदिरासमोर, धामणकर कॉर्नर, नाशिक ४२२००२ . येथून प्रकाशित केले. कार्यकारी संपादक - संजू पवार (मो. नं. ९८९०१०९९७८) निवासी संपादक - जयंत महाजन (९४२०६९१४२०) Email : mumbaimahasagar@gmail.com